RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘इलेक्टोरल बाँड प्रकरणात एसआयटी चौकशीची गरज नाही’, सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नवी दिल्ली**

लोकसभा निवडणुकीपूर्वी देशभरात गाजलेल्या इलेक्टोरल बाँड प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ’स्पेशल इन्व्हेस्टिगेटिव्ह टीम’द्वारे तपासाची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली आहे. या कथित घोटाळ्याची सध्या चौकशी करण्याची गरज नाही, त्यामुळे आम्ही याचिका स्विकारू शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. दरम्यान, राजकीय देणगीच्या बदल्यात कंपन्यांना लाभ दिल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ’कॉमन कॉज’ आणि ’सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशन’, या स्वयंसेवी संस्थांच्या याचिकेत कथित लाच राजकीय देणग्यांद्वारे देण्यात आल्याचे म्हटले आहे. इलेक्ट्रॉन बाँडद्वारे दिलेल्या देणग्यांमध्ये कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचेही याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. सीबीआय किंवा इतर कोणतीही तपास यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत नाही आहेत. त्यामुळे न्यायालयाच्या देखरेखीखाली एसआयटी तपास व्हावा, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांचे वकील प्रशांत भूषण म्हणाले की, हे प्रकरण



हवाला घोटाळा, कोळसा घोटाळासारखे आहे. या प्रकरणांमध्ये केवळ राजकीय पक्षच नाही, तर मोठ्या तपास यंत्रणांचाही सहभाग आहे. देशाच्या इतिहासातील हा सर्वात मोठा आर्थिक घोटाळा असून, यात सरकार, सत्ताधारी पक्ष आणि देशातील टॉप कॉर्पोरेट घराणे सहभागी असल्याचा दावाही भूषण यांनी यावेळी केला आहे. तसेच, काही प्रकरणांमध्ये सीबीआयचे अधिकारीही सहभागी असून, त्यांच्या भूमिकेची चौकशी झाली पाहिजे, असा युक्तिवादही प्रशांत भूषण यांनी केला. यावर सरन्यायाधीश म्हणाले की, आम्ही खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, यापूर्वीच योजना रद्द केली आहे. त्यामुळे सध्या आम्ही चौकशीचा आदेश देऊ शकत नाही.

### थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे योग्य नाही – सीजीआय

सीजेआय म्हणाले की, इतर कायदेशीर पर्याय उपलब्ध असताना थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणे योग्य नाही. आम्हाला राजकीय पक्षांनी दिलेल्या देणग्या जप्त करणे किंवा आयकराचे पुनर्मूल्यांकन करण्यास सांगणे आवश्यक वाटत नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली एसआयटी स्थापन करण्याची सध्या गरज नाही. एजन्सी तपास करत नाही किंवा तपास थांबवते अशा प्रकरणांमध्ये तक्रारदार उच्च न्यायालयात जाऊ शकतात.

## पूजा खेडकरनंतर आणखी ६ अधिकारी अडचणीत येणार डीओपीटीने वैद्यकीय प्रमाणपत्रांची तपासणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई**

पुण्यातील पूजा खेडकर विरोधात युपीएससीने दोन दिवसापूर्वी मोठी कारवाई केली. खेडकरने खोट दिव्यांग प्रमाणपत्र दिल्याचे उघड झाले आहे. यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, आता आणखी ६ अधिकारी अडचणीत आले आहेत. पूजा खेडकरचे प्रकरण समोर आल्यानंतर कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने (ऊजझढ)ने अन्य सहा अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रांची तपासणी सुरू केली आहे.



ज्या अधिकाऱ्यांची प्रमाणपत्रे तपासण्यात आली आहेत, त्यांची नावे आणि प्रमाणपत्रे गेल्या अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर शेअर केली जात होती. सोशल मीडिया पोस्ट व्हायरल झाल्यानंतर, काही परिवीक्षाधीन आणि काही सेवारत अधिकाऱ्यांची अपंगत्व प्रमाणपत्रे आता छाननीखाली आली आहेत.

पूजा खेडकर यांच्यावर फसवणुकीच्या आरोपानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगने प्रशिक्षणार्थी आयएएसची नियुक्ती रद्द केली आहे. णझडड ने फक्त तिची उमेदवारीच रद्द केली नाही, तर खेडकरला भविष्यात कोणत्याही परीक्षेत किंवा निवडीला बसण्यास परवानगी नाकारली आहे.

यूपीएससीने म्हटले आहे की, पूजा खेडकरने नागरी सेवा परीक्षेच्या म्हणजेच उडए-२०२२ च्या नियमांचे उल्लंघन केले आहे, असं उपलब्ध कागदपत्रांच्या प्राथमिक तपासणीवरून हे स्पष्ट झाले आहे.

युपीएससीने १८ जुलै रोजी पूजा खेडकरला या प्रकरणी कारणे दाखवा नोटीस दिली आहे. नावे बदलून युपीएससीच्या परीक्षा कशा दिल्या? असं यात विचारण्यात आले होते. पूजाने ४ ऑगस्टपर्यंत वेळ मागितली असली तरी तिला उत्तर देण्यासाठी २५ जुलैपर्यंत वेळ देण्यात आला होता. यावर युपीएससीने तिला ३० जुलै रोजी दुपारी ३.३० पर्यंत वेळ दिला होता, पण त्यांनी आपली बाजू मांडलेली नाही. यामुळे युपीएससीने तिची नियुक्ती रद्द केली.

## मंत्री धर्मरावबाबा आत्रम म्हणतात ;पक्षफोडी, घर फोडणे हे शरद पवारांकडूनच आम्ही शिकलोय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

शरद पवारांसारख्या मातब्बर नेत्यांकडून लोकशाही मार्गानं राजकारण अपेक्षित आहे. मात्र त्यांनी सध्या घरफोडीचा कार्यक्रम सुरू केला आहे. ते ८२ वर्षांचे आहेत, त्यांची ही रणनीती नेहमीच राहिली आहे. फोडाफोडीचं राजकारण आम्ही त्यांच्याकडूनच शिकलोय असं सांगत मंत्री धर्मरावबाबा आत्रम यांनी शरद पवारांवर निशाणा साधला आहे.



धर्मरावबाबा आत्रम म्हणाले की, शरद पवार हे ८२ वर्षांचे आहेत. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी नेहमीच कोणाला पाडायचं, पक्ष कसा फोडायचा ही रणनीती असते. फोडाफोडीचं राजकारण हे शरद पवारांकडूनच आम्ही शिकलो. आता घरफोडीचा जो कार्यक्रम शरद पवारांनी सुरू केला आहे. नेत्यांच्या मुलांना फोडण्याचं काम सुरू केले आहे. त्यांनी तसं करायला नको. राजकारणात मातब्बर नेता असताना लोकशाही मार्गाने राजकारण करायला हवं. घरफोडी करून त्यातून फारसं काही निष्पन्न होणार नाही. ज्यांना कुणाला वडिलांविरोधात उभं राहायचं असेल तर त्यांचा मार्ग मोकळा आहे. आम्ही कार्यकर्त्यांच्या संपर्कात असतो, इतकी वर्ष जनसंपर्क ठेवला आहे असंही त्यांनी म्हटलं. धर्मरावबाबा आत्रम यांच्याविरोधात त्यांची मुलगी भाग्यश्री आत्रम यांना शरद पवार गटाकडून तिकीट मिळेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर धर्मरावबाबा आत्रम यांनी हे भाष्य केले. माझ्याविरोधात मुलगी भाग्यश्री आत्रम यांना तिकिट देतील का हा प्रश्नचिन्ह आहे. ती वडिलांच्या विरोधात उभी राहील का यावरही प्रश्नचिन्ह आहे. माझी इच्छा यंदा निवडणूक लढवण्याची नाही मात्र लोकांच्या आग्रहास्तव ही शेवटची निवडणूक लढवावी यासाठी तयारी सुरू केली आहे. गेल्या ५ वर्षात चांगली कामे मतदारसंघात केली आहे. लोकसभेत जे घडलं ते या निवडणुकीत घडणार नाही याची काळजी घेऊ. विदर्भातील २० जागांवर आम्ही तयारी करतोय. लवकरच अजित पवार विदर्भात येतील. २० जागांची चाचणी सुरू आहे. जिथं उमेदवार देऊ तिथे निवडून आणू. निवडून येण्याची क्षमता असणाऱ्यांनाच उमेदवारी देऊ अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, निवडणूक ३ महिन्यावर आहे. उमेदवार देताना त्याचे कार्य, मतदारसंघात संपर्क, पक्षाची ताकद एकत्रित करून तिकिट देणं महत्त्वाचं आहे. तरुणांना वाव मिळाला पाहिजे. तरुण उमेदवार देण्याचा पक्ष विचार करत आहे. ९० जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसची लढण्याची तयारी आहे. आमचे ५३ आमदार आहेत. ९० जागांमधील १०-१५ टक्के उमेदवार तरुण असतील असा विचार सुरू आहे असंही धर्मरावबाबा आत्रम यांनी सांगितले.

## छत्रपती संभाजीनगर अन् धाराशिव नावं तशीचं राहणार; हस्तक्षेपास ‘सुप्रीम’ नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२धाराशिव**

महाराष्ट्रातील औरंगाबाद आणि उस्मानाबादच्या नामांतराला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या आहे. तसेच या नामांतरात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. तसेच नाव देण्याचा आणि बदलण्याचा अधिकार कायद्यानं राज्य सरकारला दिलेला आहे, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आहे. अलाहाबाद आणि औरंगाबाद प्रकरण सारख नसल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे.

सुनावणीवेळी न्यायालयाने अलहाबाद आणि औरंगाबाद प्रकरण एकसारखं नसल्याचेही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. नाव बदललं की, काही लोक समर्थनार्थ आणि विरोधात असणारच आहेत, असेही न्यायालयानं सुनावणी दरम्यान म्हटलं. मुंबई हायकोर्टानं तुमचं म्हणणे ऐकून घेऊन सविस्तर आदेश दिले आहेत. त्यात



आम्ही हस्तक्षेप करणार नाही, असेही यावेळी सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं.

औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्ही शहरांची नामांतरानंतर विविध स्तरातून याला विरोध करण्यात आला होता. तसेच याला आव्हान देणाऱ्या अनेक याचिकाही कोर्टात दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतरही ८ मे रोजी मुंबई उच्च न्यायालयाने औरंगाबादचे नाव छ.संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नाव धाराशिव करण्याचा राज्य सरकारचा निर्णय कायम ठेवला होता.

तसेच कायदेशीररित्या हा निर्णय योग्य असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले होते. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने नामांतराच्या विरोधात दाखल याचिका फेटाळून लावल्या आहेत. तसेच हायकोर्टानं तुमचं म्हणणे ऐकून घेऊन सविस्तर आदेश दिले आहेत. त्यात आम्ही हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केलं आहे. त्यामुळे आता दोन्ही शहरांची नावं छ.संभाजीनगर आणि धाराशिव अशीच राहणार आहेत.

## तिकीट कलेक्टर नाही आता रेल्वे अधिकारी पदकवीर ‘स्वप्नील’ला रेल्वेनेही दिलं प्रमोशन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२कोल्हापूर**

महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळेने ऑलिम्पिक स्पर्धेत शानदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावलं. देशासह महाराष्ट्राचाही मान वाढविण्याचं काम स्वप्निलने केलं. त्याच्या या यशाचा आनंद देशात साजरा होतोय. या यशाच्या आनंदात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वप्निल कुसाळेला एक कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं. आता रेल्वेनेही स्वप्निलला गुडन्यूज दिली आहे. स्वप्निल भारतीय रेल्वेत तिकीट कलेक्टर पदावर कार्यरत आहे. या कामगिरीनंतर स्वप्निल भारतात परतताच त्याला थेट अधिकारीपदी नियुक्ती दिली जाणार आहे.

नेमबाज स्वप्नील कुसाळे याने ५० मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक पटकावले आहे. स्वप्नील कुसळेचा हा विजय ऐतिहासिक आहे कारण या स्पर्धेत ऑलिम्पिक पदक जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. कोल्हापूरच्या या २९ वर्षीय




नेमबाजाचे हे पहिलेच ऑलिम्पिक आहे. या खेळाडूने पहिल्याच ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकले होते. हा खेळाडू १२ वर्षांपासून ऑलिम्पिकसाठी पात्र होण्यासाठी प्रयत्न करत होता आणि पॅरिसमध्ये त्याला संधी मिळाल्यावर त्याने इतिहास रचला.

**स्वप्निलला एक कोटींचं बक्षीस**

स्वप्निलने कांस्यपदक पटकावल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वप्निलसह कुटुंबियांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. खाशाबा जाधव यांच्यानंतर भारताला तब्बल ७२ वर्षांनी वैयक्तिक खेळामध्ये कांस्यपदक मिळालं असून कोल्हापुरच्या छोटयाशा गावातील स्वप्निलने इतिहास रचला आहे. स्वप्निलसह त्याचे प्रशिक्षक विश्वजीत शिंदे आणि दिपाली देशपांडे, सहकार्य करणाऱ्या सर्वांचेच आभार मानत आहे. या यशाबद्दल आम्हाला स्वप्निलचा अभिमान आणि गौरव असल्याचंही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. स्वप्निल कुसळेला १ कोटी रुपयांचं बक्षीस देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

## मी कुठे अडकत नव्हतो म्हणून मला देवेंद्र फडणवीस यांनी यात अडकवला; जरांगे पाटलांचा थेट आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२पिंपरी**

मी कुठे अडकत नव्हतो म्हणून मला देवेंद्र फडणवीस यांनी यात अडकवला आहे. बदनामी केली जात आहे. छत्रपतींचा इतिहास दाखविण्यात कसली बदनामी, नाटक लोकांना दाखविताना तोटा आला. मग काय करायचे? असा दावा मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी पिंपरीत केला आहे. पुणे न्यायालयात एका दाव्यासंदर्भात मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे हजर शुक्रवारी हजर होणार असल्याने गुरुवारी रात्री उशिरा पिंपरी चिंचवड शहरात दाखल झाले होते. दरम्यान जरांगे पाटील यांनी समर्थक आणि कार्यकर्त्यांसह पुण्यात विधानसभा निवडणुकीच्या आढावा घेतला.

**ताकदीने कामाला लागलो आहे**

विधानसभा निवडणूक लढविणार कि नाही? यावर प्रश्नावर जरांगे पाटील म्हणाले, ’राजकारणात आम्हांला ढकलले जात आहे. आरक्षणावर आम्ही ठाम आहोत. इतर समाजानेही आम्हांला पाठिंबा दिला आहे. विधानसभा निवडणुकीत समाजाला विचारून विधानसभा




निवडणुकीत उमेदवार पाडायचे आहेत की उभा करायच आहे. यावर निर्णय घेणे बाकी आहे. याचा निर्णय २९ ऑगस्टला होणार आहे. आमचे टार्गेट कोण आहे, हे आणि १९ ऑगस्टला सांगू. २९ तारखेपर्यंत मी काहीच नाही बोलणार. थोडे थोडे राजकारण मलाही समजु लागले आहे.’

जरांगे पाटील म्हणाले, ’नाट्य दिग्दर्शकाचा फसवणुकीचा प्रकरण न्यायालयात आहे. त्यामुळे मी त्याच्यावरती बोलणार नाही. मात्र, मी न्यायालयाचा सन्मान केलेला आहे. मी आज हजर व्हायला जात आहे. महाराजांचा इतिहास जनतेला दाखविण्याच्या उद्देशाने शंभूराजे महानाट्य दाखवण्यात आले. त्या नाटकाशी माझा संबंध आहे. मात्र, त्या नाटकाच्या व्यवहाराची माझ्या काही संबंध नाही. शंभूराजे नाटकाचे तोटा झाला होता. तो आम्ही तिघांनी वाटून घेतला होता. ज्यावेळी हा नाटक आयोजित करण्यात आला होता. त्यावेळेस पण आम्ही सामान्य पोर होतो आणि आम्ही आज देखिल सामान्य पोरच आहोत. त्यातील एका व्यक्तीने दिग्दर्शकाला पैसे भरून देण्याचे आश्वासन दिले होते. आमच्यातला एक जण म्हणाला की, माझ्या आणि दिग्दर्शकाचा बरं आहे. मी त्याला पैसे देतो. मात्र, ते त्यांनी दिले की नाही, हे मला माहित नाही.’

## संपादकीय ......

# निकाल लागला; प्रश्न कायम

सर्वोच्च न्यायालयाने एखाद्या बहुचर्चित आणि जनतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या मुद्द्याविषयी निर्णय दिल्यास तो मुद्दा राजकीयदृष्ट्या संपतो का, असा प्रश्न पडण्यामागचे कारण म्हणजे, अलीकडे देशभरात जोरदार गाजलेला 'नीट'चा मुद्दा होय. सर्वोच्च न्यायालयाने 'नीट' परीक्षा पुन्हा घेण्याचे निर्देश द्यायला नकार दिला. त्यानंतर 'नीट'चा मुद्दा हळूहळू संपत असल्याचे दिसत आहे.

देशात ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आला. त्याच निकालाच्या दिवशी 'नीट'चा निकालही एनटीएने अचानक जाहीर केला. त्या दिवसापासून वादाला सुरुवात झाली. त्याचे कारण म्हणजे, निकालाच्या अपेक्षित तारखेपेक्षा अगोदरच निकाल जाहीर करण्यात आला. यावर्षीच्या निकालामध्ये टॉपर्सची संख्या थेट ६७ वर पोहोचली. काही परीक्षा केंद्रांवरील विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्यात आले. काही परीक्षा केंद्रांवर कथित पेपरफुटी झाल्याच्या आरोपालाही सुरुवात झाली. अशाप्रकारे संपूर्ण देशभराच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेला मुद्दा राजकीय पक्षांना सापडला. देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधींसह पक्षाच्या नेते-कार्यकर्त्यांनी 'नीट'चा मुद्दा राष्ट्रीय बनवला. फक्त काँग्रेसच नाही तर त्याबरोबर समाजवादी पक्ष, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, तृणमूल काँग्रेस, आम आदमी पक्षासह इतर विरोधी पक्षांनीही यावरून केंद्र सरकार आणि परीक्षा आयोजित करणार्या राष्ट्रीय चाचणी संस्थेला (एनटीए) धारेवर धरले. राजकीय पक्षांनी देशभरातील शहरांमध्ये रस्त्यावर उतरण्यापासून ते पक्षाच्या खासदारांनी संसदेपर्यंत आवाज उठवला. राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटनांनी सरकारविरोधात मोर्चे-आंदोलने केली. शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही विरोधी पक्षांनी केली. त्याचबरोबर संपूर्ण परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्यात यावी, अशी मागणीही विरोधकांकडून करण्यात आली. दुसरीकडे सत्ताधारी पक्षाने सरकार विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर गंभीर विचार करत असल्याचे सांगितले. एनटीएच्या चौकशीसाठी समिती स्थापन केल्याची घोषणा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केली. संसदेतही सत्ताधारी पक्षाने परीक्षेमध्ये पेपरफुटी झाली नसल्याचा मुद्दा ठामपणे मांडला. शेवटी सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना सांगितले की, संपूर्ण परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा ठोस पुरावा मिळाला नाही. काही परीक्षा केंद्रांवर गडबड झाल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले; मात्र यामुळे २४ लाख विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा घेण्याचे निर्देश देणे योग्य नसल्याचेही न्यायालयाने सांगितले. यामुळे राजकीय पक्षांच्या हातातला मुद्दा संपल्याचे चित्र आता देशात आहे.

या अगोदरच्या अनेक बहुचर्चित आणि जनतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मुद्द्यांच्या बाबतीतही असेच झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने फ्रान्सकडून राफेल विमानांची खरेदी केली होती. या व्यवहारात घोटाळा झाल्याचा आरोप काँग्रेससह विरोधी पक्षांनी केला होता. सरकारच्या विरोधात काँग्रेसने देशभरात हा मुद्दा जोरदार उठवला होता. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले; मात्र सर्वोच्च न्यायालयाने याप्रकरणी सरकारला क्लीन चिट दिली. तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांच्या नेतृत्वातील खंडपीठाने याप्रकरणी निकाल सुनावला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिकाही दाखल करण्यात आली. ही याचिकाही न्यायालयाने फेटाळली.

त्यानंतर राफेल खरेदी घोटाळ्याचा मुद्दा संपला. यासारखे अनेक राष्ट्रीय स्तरावर गाजलेले मुद्दे संपल्याचे आपण पाहिले आहेत. विरोधी पक्षांनी त्या-त्या वेळी प्रत्येक मुद्द्याचा विरोधात जोरदार आवाज उठवला, तर दुसरीकडे सत्ताधारी पक्षाने आपली भूमिका मांडली; मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर हे वादविवाद संपुष्टात आले. म्हणून हा प्रश्न उपस्थित होतो की, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागला असला, तरी राजकीय पक्षांच्या हातातील मुद्दे संपतात का?

# जिल्ह्यातील वरुड तालुक्यासह राज्यात ३४ तालुक्यांत होणार डिजीटल क्रॉप सर्वे

## इतर तालुक्यांत होणार ई पीक पाहणी

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** राज्यातील पेरण्या झाल्या असून या पेरण्यांची नोंद सातबाऱ्यावर ऑनलाईन पद्धतीने होण्यासाठी ई पीक पाहणी करावी लागते. पण बऱ्याचदा शेतात न जाता शेतकरी ई पीक पाहणी करतात. किंवा शेतात एका पिकांची लागवड केली असताना दुसऱ्याच पिकांची नोंद करतात. त्यामुळे ई पीक पाहणी अधिक अचूकरित्या व्हावी यासाठी केंद्र सरकारने डिजीटल क्रॉप सर्वे हा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यामुळे अधिक अचूक माहिती सरकारपर्यंत पोहचणार आहे.




दरम्यान, डिजीटल क्रॉप सर्वे ही प्रणाली म्हणजेच ई पीक पाहणी (ऊडड) आणि ई पीक पाहणी ही प्रणाली जवळपास सारखीच आहे. पण डिजीटल क्रॉप सर्वे करताना शेतकऱ्याला त्याच्या क्षेत्राच्या गट हद्दीत जाणे बंधनकारक आहे. त्या गटाच्या हद्दीत गेल्याशिवाय शेतकऱ्याचा पोर्टलवर फोटो अपलोड करता येणार नाहीत. यामुळे सरकारपर्यंत अचूक माहिती जाण्यास मदत होऊन धोरणात्मक निर्णय घेण्यास फायदा होणार आहे.

सध्या राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३४ तालुक्यांमध्ये डिजीटल क्रॉप सर्वेचा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. तर यामध्ये २ हजार ८५८ गावांचा सामावेश आहे. शेतकऱ्यांना तालुका निवडल्यानंतर एका प्रणालीद्वारे तुमचे लाईव्ह लोकेशन ट्रॅक केले जाईल आणि त्यानंतर गट हद्दीत जाऊन शेतकऱ्यांना पिकाचा फोटो प्रणालीवर अपलोड करता येणार आहे.

### जिल्ह्यांतील या तालुक्यात होणार डिजीटल क्रॉप सर्वे

| | | |
|---|---|---|
| अमरावती – वरुड | हिंगोली – औंढा नागनाथ | अहमदनगर – श्रीरामपूर |
| बुलडाणा – बुलडाणा | ठाणे – अंबरनाथ | जळगाव – भुसावळ |
| यवतमाळ – दिग्रस | सिंधुदुर्ग – वेंगुर्ला | धुळे – शिंदखेडा |
| वाशिम – रिसोड | रायगड तळा | नंदुरबार – तळोदा |
| छ. संभाजी नगर – फुलंब्री | रत्नागिरी – लांजा | अकोला – पातूर |
| धाराशीव – लोहारा | नागपूर – काटोल | पुणे – दौंड |
| जालना – बदनापुर | गडचिरोली – देसाईगंज /वाडसा | कोल्हापूर – गगनबावडा |
| नांदेड – मुदखेड | भंडारा – साकोली | सांगली – पळूस |
| परभणी – सोनपेठ | चंद्रपूर – सिंदेवाही | सातारा – खंडाळा |
| बीड – वडवणी | गोंदिया – आमगाव | सोलापूर – द.सोलापूर |
| लातूर – जळकोट | नाशिक – देवळा | वर्धा – कारंजा (घा) |

# सोयाबीन पिकावर शिफारस केलेल्या कीटकनाशकांचीच फवारणी करा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** सोयाबीनची लागवड झालेल्या अनेक भागात गेल्या आठवडाभरात पावसाची संततधार असल्याचे वृत्त आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये गेल्या आठवड्यापासून सोयाबीनवर विविध किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

या संदर्भात, सोयाबीन पिकावर हल्ला करणाऱ्या संभाव्य कीटकांच्या नियंत्रणासाठी, केंद्रीय कीटकनाशक मंडळाने अलीकडील काळात सोयाबीन पिकावर शिफारस केलेल्या कीटकनाशकांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या कीटकनाशकांपैकी एकाची फवारणी करावी.

१) घाटे अळीच्या नियंत्रणासाठी पिकावर इंडोक्साकार्ब १५.८०% ईसी (३३३ मिली/हेक्टर) फवारणी करावी. यासाठी आणखी पर्यायी कीटकनाशके आहेत, जसे इमामेक्टीन बेंजोएट ०१.९० (४२५ मिलि/हे), किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/ली. एस.सी. (४२-६२ ग्रॅम/हे), किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ एस.सी. (१५० मिलि) किंवा नोवाल्युरोन इंडोक्साकार्ब एस.सी. (८७५-८२५ मिली/हेक्टर) यांच्यापैकी एकाची पिकावर फवारणी करावी.

२) जर पिकावर बिहारी केसाळ सुरवंटाचा प्रादुर्भाव झाला असेल, तर त्याच्या नियंत्रणासाठी फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ एस.सी. (१५० मिली) किंवा इमामेक्टीन बेंजोएट ०१.९० (४२५ मिली/हे.), किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/ली एस.सी. (४२-६२ ग्रॅम/हे), फवारणीसाठी वापरावे किंवा स्पिनेटोराम ११.७ एससी (४५० मिली/हे.) ची फवारणी करावी.

३) चक्री भुंग्याच्या प्रादुर्भावाची लक्षणे दिसू लागल्यावर, सुरुवातीच्या टप्प्यातच त्याच्या नियंत्रणासाठी थायक्लोप्रिड २१.७ एस.सी. चा (७५० मिली/हेक्टर) वापर करावा किंवा इमामेक्टीन बेंझोएट (४२५ मिली/हेक्टर) किंवा आयसोसायक्लोसेराम ९.२% डब्ल्यू डब्ल्यू डीसी (१०% डब्ल्यू/व्ही) डीसी (६०० मिली/हे) किंवा कार्टेप हायड्रोक्लोराईड ०४% + फिप्रोनिल सीजी % ००.५० (२०० मिली /हे) किंवा एसिटेमीप्रीड २५% + बायफेंथ्रिन २५% थत्रः(२५० ग्रॅम/हे) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एस.सी. (२५०-३०० मिली/हेक्टर) किंवा प्रोफेनोफॉस ५० एउ (१ ली/हेक्टर) किंवा क्लोराँट्रानिलिप्रोल १८.५ एस.सी. १८.५०% एस.सी. (१५० मिली/हेक्टर) ची फवारणी करावी. चक्री भुंग्याच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरुवातीच्या टप्प्यावर झाडाचे प्रभावित भाग उपटून नष्ट करावेत.

४) जर तुमच्या पिकावर खोड माशीचा प्रादुर्भाव झाला असेल तर तिच्या नियंत्रणासाठी थायोमेथोक्झाम लॅम्बडा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली/हेक्टर) किंवा बीटासिफ्लुथ्रिन इमिडाक्लोप्रिड (३५० मिली/हेक्टर) किंवा एसीटेमिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हेक्टर) ची फवारणी करावी.

५) उंट अळीच्या नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणतेही एक रसायन फवारावे

लोरएन्ट्रानिलीप्रोल १८.५ एससी (१५० मिली/हेक्टर) किंवा इमामेक्टीन बेंझोएट ०१.९० (४२५ मिली/हेक्टर), किंवा ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/हे. (४२-६२ ग्रॅम/हे), किंवा फ्लुबेन्डियामाईड २० थत्रः (२५०-३०० ग्रॅम/हे) किंवा फ्लुबेन्डियामाईड ३९.३५ डउ (१५० मिलि/हे) किंवा एसीटेमिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% थत्रः (२५० ग्रॅम/हे) किंवा इंडोक्साकार्ब १५.८ डउ (३३३ मिलि/हे), किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ४.९० उड (३०० मिली/हे.) किंवा प्रोफेनोफॉस ५० ईसी (१ लि./हे.) किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी, (२५०-३०० मिली/हे.) किंवा पूर्वमिश्रित बीटासिफ्लुथ्रिन + इमिडाक्लोप्रिड (३५० मिली/हेक्टर) किंवा नोवल्युरॉन + इंडॉक्साकार्ब ४.५०% एस. सी. (८२५-८७५ मिलि/हे) किंवा त्रिमिक्स्ड थायोमेथोक्झाम + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली/हेक्टर) किंवा क्लोराँट्रानिलित्रोल ०९.३० % + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ०४.६०% नउ, (२०० मिली/हेक्टर) ची फवारणी करावी.




६) तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी खालीलपैकी कोणत्याही एका रसायनाची फवारणी करा

इमॅमेक्टिन बेंझोएट १.९० (४२५ मिली/हे.), ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/लि. एस.सी. (४२-६२ ग्रॅम/हे), किंवा एसीटेमिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५%थत्रः(२५० ग्रॅम / है) किंवा फ्लूबेंडियामाइड २० थत्रः (२५०-३०० ग्रॅम/हे) किंवा फ्लुबेन्डियामाइड ३९.३५ एससी (१५० मिली) किंवा इंडोक्साकार्ब १५.८ एससी (३३३ मिली/हे.), किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी, (२५०-३०० मिली /हेक्टर) किंवा स्पिनेटराम ११.७ एससी (४५० मिली/हे.) किंवा नोवल्युरोन इंडॉक्साकार्ब ०४.५०% एससी (८२५-८७५ मिली/हेक्टर) ची फवारणी करावी.

७) पिकावर जर उंट आळी किंवा घाटे आळी किंवा तंबाखूचे पाने खाणारी आळी किंवा तिन्ही एकत्र आढळल्यास यांना नियंत्रिण करण्यासाठी, आपल्या पिकावर खालीलपैकी कोणत्याही एका रसायनाची फवारणी करा.

ब्रोफ्लानिलाइड ३०० ग्रॅम/ली डउ (४२-६२ ग्रॅम/हे), किंवा फ्लुवेंडियामाइड ३९.३५ डउ (१५० मिलि/हे) किंवा इंडोक्साकार्ब १५.८ डउ (३३३ मिलि/हे), किंवा नोवाल्युरोन + इंडोक्साकार्ब ०४.५०% डउ (८२५-८७५ मिली/हेक्टर) ची फवारणी करावी.

८) पाने खाणाऱ्या अळ्या (उंट आळी किंवा घाटे आळी किंवा तंबाखूचे पाने खाणारी आळी) आणि पांढरी माशी/तुडतुडे सारख्या रस शोषणाऱ्या किडी किंवा खोड माशी/चक्री भुंगा यांसारख्या कीटकांच्या एकाच वेळी नियंत्रणासाठी थायोमेथोक्सॅम १२.६०% + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५०% झेडसी. (१२५ मिली/हेक्टर) किंवा बीटासायफ्लुथ्रिन इमिडाक्लोप्रिड (३५० मिली/हेक्टर) किंवा ॲसिटामिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हे) किंवा क्लोराँट्रानिलिनोल ९.३० + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५०% डब्लू.जी. (२०० मिली/हेक्टर) ची फवारणी करावी.

९) जेव्हा पिवळ्या मोझॅक/सोयाबीन मोझॅक रोगाची लक्षणे दिसू लागतील तेव्हा रोगग्रस्त झाडे शेतातून उपटून टाका आणि या रोगांचा प्रसार करणाऱ्या पांढऱ्या माश्या/अफिड्स रोखण्यासाठी एसीटामिप्रिड २५% + बायफेन्थ्रीन २५% डब्ल्यूजी (२५० ग्रॅम/हेक्टर) फवारणीसाठी वापरावे. किंवा, थायोमेथॉक्सम लॅम्बडा सायहॅलोथ्रिन (१२५ मिली/हेक्टर) किंवा बीटासायफलुथ्रिन + इमिडाक्लाेप्रिड या कीटक नाशकांची ही फवारणी करता येते. त्यांच्या फवारणीद्वारे खोड माशी देखील नियंत्रित केली जाऊ शकते. पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात ठिकठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत.

१०) सतत पाऊस पडणाऱ्या भागात अँथ्रैक्नोंज रोगाची शक्यता जास्त असते. त्यामुळे त्याची सुरुवातीची लक्षणे दिसल्यानंतर शेतकऱ्यांनी त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लवकरात लवकर टेब्युकोनाझोल २५.९ ईसी (६२५ मिली/हेक्टर) हे फवारणीसाठी वापरण्याचा सल्ला दिला जातो. किंवा टेब्युकोनाझोल ३८.३९ एस.सी. (६२५ मिली/हे.) किंवा टेब्युकोनाझोल १०%+सल्फर ६५% डब्ल्यूजी (१.२५ किलो/हेक्टर) किंवा कार्बेन्डाझिम १२% + मँकोझेब ६३% डब्ल्यू.पी. (१.२५ किलो/हेक्टर) ची पिकावर फवारणी करावी.

११) रायजोक्टोनिया एरिअल ब्लाइट (ठ-इ) या रोगाची लक्षणे दिसून येताच त्यावर नियंत्रण ठेवावे व शिफारस केलेले बुरशीनाशक पायरोक्लोस्ट्रोबीन २०% थत्रः (३७५-५०० ग्रॅम/हे) ची आपल्या पिकावर फवारणी करावी.

१२) सोयाबीनच्या शेतात पक्षांना बसण्यासाठी ठिकठिकाणी 'ढ' आकाराचे पक्षी थांबे बसवण्याचा सल्ला देण्यात येतो, त्यामुळे पाने खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांसाठी शेतात बसण्याची सोय होते.

१३) कीटकनाशक फवारणी साठी कोन नोजल तर तणनाशक फवारणीसाठी फ्लड जेट/फ्लॅट फॅन नोजल वापरावा.

इतर महत्वाचे सल्ले

१) सोयाबीन पिकाच्या संरक्षणासाठी शिफारस केलेली रसायने (कीटकनाशके / बुरशीनाशके फवारण्यासाठी पुरेसे पाणी (नॅपसॅक स्प्रेअर किंवा ट्रॅक्टर चलित स्प्रेअरसाठी ४५० लिटर/हेक्टर, पॉवर स्प्रेअरसाठी किमान १२५ लिटर/हेक्टर) वापरावे.

२) सोयाबीन पीक फुलोऱ्यात असले तरी देखील कीड व रोगांपासून पिकाच्या संरक्षणासाठी योग्य व शिफारस केलेल्या रसायनांची फवारणी करावी.

३) कोणत्याही प्रकारच्या कृषी निविष्ठा खरेदी करताना दुकानदाराकडून नेहमी एक पक्के बिल घ्यावे ज्यावर बेंच क्रमांक आणि कालबाह्यता (एक्स्पायरी) तारीख स्पष्टपणे लिहिलेली असेल.

४) सोयाबीन पिकासाठी केंद्र सरकारच्या कीटकनाशक मंडळाने प्रसारित केलेल्या यादीमध्ये समाविष्ट असलेलीच रसायने (कीटकनाशके /तणनाशके / बुरशीनाशके) पिकासाठी वापरावीत.

५) ज्या रसायनांची (कीटकनाशके /तणनाशके / बुरशीनाशके) मिश्रित वापरासाठी शास्त्रीय शिफारस नाही, असे मिश्रण कधीही करू नये किंवा वापरू नका. त्यामुळे पिकाचे नुकसान होऊ शकते.

६) तंबाखूवरील पाने खाणाऱ्या अळीच्या नर पतंगाला नष्ट करण्यासाठी एकरी चार कामगंध सापळे शेतात लावावेत.

**एस ए जायभाय**

सोयाबीन कृषीविद्यावेत्ता व वैज्ञानिक ड आघारकर संशोधन संस्था, पुणे




## पावसाळ्यात 'असा' आहार घेतल्यास उत्तम

**विदर्भ प्रजासत्ताक**

दि.२अमरावती –पावसाळ्यात साधी सोपी ऋतुचर्या जर आपण स्वीकारली तर संसर्गाविना निरोगी राहता येईल. पावसाळ्याच्या दिवसात लघू आणि गरम म्हणजेच उष्ण गुणाचा आहार घ्यावा. या ऋतूत ओवा, हळद, मिरी, सुंठ यांची पावडर करून भाकरी, चपातीत वापरल्यास उत्तम.

मांसाहारी व्यक्तीने पावसाळ्यात मांस खाण्यापेक्षा त्याचे सूप करून प्यावे. यातही सुंठ, मिरी, पुदिन्याचा सढळ हाताने वापर करावा. आपल्या आहारातील विविध अन्नपदार्थ तयार करण्यासाठी आपण जे धान्य वापरतो ते जुने असावे. पण एक वर्षापेक्षा अधिक जुने मात्र शक्यतो असू नये. ज्वारीची भाकरी, कमी तेलाच्या पोळ्या, गरम दूध, शक्यतो मुगाचे वरण, भात अशी आहाराची मांडणी असावी. नवीन धान्य वापरायचे असेल तर ते धान्य भाजून घेतल्यास अधिक चांगले. त्यामुळे अशा भर्जित धान्यवत अग्नीचे संस्कार होऊन ते शरीरातील अग्नीकडून पचविण्यास हलके - लघू बनते. आठवड्यातून एकदा लंघन करावे. तेलापेक्षा साजूक तुपाचा अधिक वापर करावा. या दिवसांत ताजे व गरम अन्न सेवन करावे. पचनास हलका, शक्तिदायक, शुष्क आहार घ्यावा.या ऋतूमध्ये स्वयंपाकामध्ये मुरे, जिरे, हिंग, सुंठ, लिंबू, लसूण, कांदा, आले, कडुलिंब यांचा नेहमीपेक्षा थोडा अधिकच वापर करावा. कारण हे सर्व पदार्थ उष्ण असून पचण्यास हलके असे आहेत. ते आहाराच्या पचण्यास खूपच साहाय्यकारी ठरतात. पावसाळ्यात सर्वसामान्य आहारात लाह्या, भाकरी, चपाती, दूधभात, पिठले चालेल. पावसाळ्याच्या काळात दिवसा झोपणे, जास्त परिश्रम, रूक्ष पदार्थ सेवन हे आयुर्वेदाने निषिद्ध मानले आहे. ते टाळलेले बरे. दह्याऐवजी ताक घ्यावे. तेदेखील ताजे, पातळ व जिरे, हिंग, काळे मीठ घालून प्यावे. ताक नसेल तर आयत्यावेळी दह्यामध्ये थोडे पाणी घालून, घुसळून ताक करून घ्यावे. दही ताजे असावे. अर्थात यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे हितकारक.



पावसाळ्याच्या दिवसात पचनसंस्था आणि जठराचे काम मंदावते. परिणामी, शरीरात इन्फेक्शन होण्याचे प्रमाण वाढते. पावसाळ्याच्या काळात सर्व प्रकारच्या भाज्या व फळे स्वच्छ धुवून घ्यावीत. मोजकेच तेल, वात कमी करणारे आहे, तर साजूक तूप, वात आणि पित्त दोन्ही कमी करणारं आहे. पावसाळ्यात वात आणि पित्त दोन्ही वाढलेले असते, म्हणून जमल्यास अन्नपदार्थ साजूक तुपात बनवावेत. वनस्पती तुपात नव्हे. तेलातील विशिष्ट घटकामुळे पित्त वाढते आणि वर्षा ऋतूत पित्तसंचयाचा ऋतू! म्हणून तेलात तळलेले पदार्थ या दिवसात खाऊ नयेत. पावसाळ्यात गरम भजी, बटाटेवडे खावेसे वाटले तरी, प्रमाणात खावेत. या दिवसांत हलके जेवण पचण्यास सोपे असते. तेल तसेच मसाल्याच्या पदार्थांपासून शक्यतो दूर राहावे. बराच काळ उघड्यावर राहिलेले खाद्यपदार्थ शरीरात इन्फेक्शन निर्माण करू शकतात. दुधी, भेंडी, पडवळ, श्रावणघेवडा, वाल, गवार या भाज्या अवश्य खाव्यात पण पालेभाज्या टाळाव्यात. दूध पिताना सुंठ, हळद घालूनच प्यावे. हिंग, मिरी, आलं, लसूण, कढीपत्ता, कोथिंबीर, पुदिना हे सर्व घटक अन्नपचनाला मदत करतात, ते वापरा. यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे हितकारक.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# सावधान ! अमरावती शहरात कोरोनाचे पुनरागमन


## शहरात कोरोनाचे सहा रुग्ण आरोग्य यंत्रणा हादरली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** अमरावती शहरात नव्याने सहा कोरोना पॉझिटिव्ह, तर एक रुग्ण स्वाइन फ्लूचा आढळल्याने आरोग्य यंत्रणा हादरली आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतून प्राप्त झालेल्या नमुने चाचणीच्या अहवालातून ही बाब निर्दशनास आली आहे. त्याअनुषंगाने आरोग्य यंत्रणेने उपाययोजना आखण्यास प्रारंभ केला असून, नमुने तपासणीवर भर दिला जाणार आहे.हल्ली पावसाळा असल्यामुळे वातावरणातील बदल आणि साथरोगांची लागण मोठ्या प्रमाणात होत असल्याचे वास्तव आहे. त्यामुळे कोरोनाने डोकेवर काढल्याचा अंदाज वर्तविला जात आहे. या वर्षी उन्हाळ्यात अमरावती जिल्ह्यात कोरोनाचा एकही रुग्ण आढळला नव्हता मात्र सध्या पावसाळ्यात साथरोगांची लागण वाढली असून, शासकीय-खासगी रुग्णालयात रुग्णांची संख्या दरदिवशी वाढतच आहे. अशातच जिल्हा आरोग्य मंत्रणेकडून २४ ते ३० जुलै दरम्यान एकूण १४० जणांचे मुने चाचणीसाठी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत पाठविले असता यात सहाजण कोरोना पॉझिटिव्ह, तर एक रुग्ण स्वाइन फ्लूचा आढळला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात स्वाइन फ्लूच्या ६० वर्षीय रुग्णावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

### 'इर्विन' हाऊसफुल्ल

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गत १५ दिवसांपासून साथरोगाचे रुग्ण वाढले आहेत. एका बेडवर दोन ते तीन रुग्णांवर उपचार ही अलीकडे नित्याचीच बाब झाली आहे. तर तोकड्या कर्मचारी व्यवस्थेमुळे 'इर्विन'ची आरोग्य यंत्रणा सलाइनवर असल्याचे वास्तव आहे. अशातच आता कोरोनाचे नवे आव्हान उभे ठाकल्याने जिल्हा आरोग्य यंत्रणासमोर निधी आणि कर्मचारी अशा दुहेरी संकटाचा सामना करावा लागणार आहे.






### सहा पॉझिटिव्ह रुग्ण शहरातीलच

अमरावती विद्यापीठाने १४० नमुन्यांची तपासणी केली असून यात सहाजण कोरोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. यात अंबा विहार येथील ५५ वर्षीय पुरुष, साईनगर येथील ३२ वर्षीय युवक, गोपालनगर येथील ४२ वर्षीय पुरुष, विलासनगर येथील ५६ वर्षीय पुरुष, सराफा काळाराम मंदिर येथील २४ वर्षीय युवक, तारखेडा येथील ५० वर्षीय पुरुषाचा कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण म्हणून समावेश आहे. १४० जणांमध्ये ४३ महिलांचे नमुने चाचणीकरिता पाठविले असता यात एकाही महिलेचे नमुने पॉझिटिव्ह आढळून आले नाहीत. जिल्हा आरोग्य यंत्रणेकडून २४ ते ३० जुलै यादरम्यान घेण्यात आलेल्या १४० जणांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. यात सहाजण कोरोना पॉझिटिव्ह, तर एकजण स्वाइन फ्लूची लागण असल्याचे अहवालावरून स्पष्ट झाले. वातावरणातील बदलामुळे कोरोनाचे रुग्ण आढळून येत असावेत. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे.

**प्रशांत ठाकरे,** नोडल अधिकारी प्रयोगशाळा, अमरावती विद्यापीठ

# १.६७ लाख उज्वलांना मोफत तीन गॅस सिलिंडर

## लाभार्थींना आता वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती–** जिल्ह्यात केंद्र शासनाचे ३०० रुपयांचे अनुदान मिळणाऱ्या १,६७,०१४ उज्वला योजनेच्या महिला लाभार्थींना आता वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत मिळणार आहेत. शिवाय मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींच्या नावे गॅस कनेक्शन असल्यास त्यांनादेखील या योजनेचा लाभ मिळणार आहे.

अर्थसंकल्पात मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा करण्यात आली होती. याबाबत मंगळवारी शासनादेश जारी झालेला आहे. त्यानुसार प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थींना वर्षाला तीन मोफत सिलिंडर मिळणार आहेत. यामध्ये गॅस सिलिंडरची बाजारभावानुसार होणारी ८३० रुपयांची रक्कम लाभार्थींजवळून तेल कंपनी घेतील व त्यानंतर केंद्र शासनाचे ३०० रुपये व राज्य शासनाचे ५३० रुपये असे एकूण ८३० रुपये महिला लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहेत. एका महिन्यात एकाच सिलिंडरसाठी शासन अनुदान मिळेल. योजनेच्या अंमल बजावणी साठी जिल्हाधिका री वा अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय समिती गठन केली जाणार आहे. या समितीचे सदस्य सचिव जिल्हा पुरवठा अधिकारी राहतील. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थीच्या नावे गॅस कनेक्शन असल्यास त्यांनाही पहिले गॅस सिलिंडर रक्कम देऊन घ्यावे लागेल. नंतर शासन अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.



### ५.८२ लाख जनरल गॅस कनेक्शन

जिल्ह्यात विविध कंपन्यांचे ५,८२,३६० जनरल गॅस कनेक्शन आहेत. लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या नावे गॅस कनेक्शन असल्यास त्यांना अन्नपूर्णा योजनेचा लाभ मिळेल. एका कुटुंबातील एकाच लाभार्थीला या योजनेचा लाभ दिला जाईल. केवळ १४.४ किलो वजनाच्या गॅस सिलिंडरची जोडणी असलेल्या ग्राहकांनाच योजनेचा लाभ मिळेल.

जिल्ह्यात प्रधानमंत्री उज्वला योजनेचे १,६७,०१४ लाभार्थी आहेत. त्यांना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा लाभ मिळेल. ५,८२,३६० जनरल गॅस कनेक्शन आहेत. यामध्ये मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थींच्या नावे गॅस कनेक्शन असल्यास त्यांना योजनेचा लाभ मिळणार आहे.

**– निनाद लांडे, जिल्हा पुरवठा अधिकारी**

# शहरातील ३७१ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केली यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** पोलिस आयुक्तालय स्तरावरील पोलिस आस्थापना मंडळ यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून नमुद श्रेणी उपनिरीक्षक ते पोलिस शिपाई २८२ आणि पोलिस अंमलदार ८९ अशा ३७१ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. सीपी नवीनचंद्र रेड्डी यांनी गुरुवार १ ऑगस्टला रात्री उशिरा या दोन्ही याद्या प्रकाशित केल्या आहेत. यातील २८२ बदल्या या संबंधित ठिकाणी त्यांच्या विहित कालावधी पूर्ण झाल्याने च करण्यात आल्या. तर पोलिस अंमलदार ८९ बदल्या विनंतीनुसार करण्यात आल्या आहेत.



प्राप्त माहितीनुसार, एएसआय, जीपीएसआय, हेडकॉन्स्टेबल, पोलिस नाईक, पोलिस कॉन्स्टेबल, लेडीज पोलिस कॉन्स्टेबल, लेडीज पोलिस नाईक, एलएएसआय, डीएचसी डीएएसआय आदी २८२ कर्मचाऱ्यांच्या बदल्या त्यांचा वर्तमान ठिकाणी विहित कालावधी पूर्ण झाल्याने प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्या आल्या.तर दुसरीकडे सपोउपनि, श्रेणी पोउपनि, पोलिस हवालदार, पोलिस नाईक, सपोना, पोलिस शिपाई चापोहवा, महिला पोलिस हवालदार, महिल पोलिस शिपाई आदी ८९ पोलिस कर्मचाऱ्यांच्य बदल्या विनंतीवरून करण्यात आल्या आहेत. सर्वांना तत्काळ नव्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश देण्यात आले आहे.-

# राज्यात पशुवैद्यकीय प्रवेशाचा पुन्हा श्रीगणेशा

## 'नीट'च्या नव्या गुणपत्रिकेचा आधार

### १४ ऑगस्टला अंतिम गुणवत्ता यादी होणार प्रकाशित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** 'नीट' ची सुधारित रँकिंग जाहीर होण्यापूर्वीच घाई गडबडीत राज्यातील पशुवैद्यकीय प्रवेश रेटण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेल्या गोंधळावर 'लोकमत' ने प्रकाशझोत टाकला होता. त्याची दखल घेत आता महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठातर्फे आता नव्या गुणपत्रिकेच्या आधारावर नवे वेळापत्रक जाहीर केले आहे.

नीट परीक्षेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली असतानाही महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठातर्फे पशुवैद्यकीय अभ्यासक्रमासाठीची प्रवेश प्रक्रिया घाईघाईने राबविण्यात आली. यासाठी २५ जून ते ७ जुलैदरम्यान पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले होते. त्याचवेळी राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत १,५६३ विद्यार्थ्यांची नीटची फेर परीक्षा घेऊन सर्व विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल ३० जून रोजी जाहीर केला. या निकालानंतर प्रत्येक विद्यार्थ्याची ऑल इंडिया रँक बदलली.



पशुवैद्यकीय प्रवेश प्रक्रियेसाठी ही नव्याने आलेली गुणपत्रिका ग्राह्य धरणे अपेक्षित होते. पण असे न होता महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे जुनेच गुण आणि ऑल इंडिया रँक ग्राह्य धरून दि.१८ जुलै रोजी पशुवैद्यकीय प्रवेशासाठीची तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर केली होती. फेर परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राचे विद्यार्थी नसल्याने याचा फारसा परिणाम गुणवत्ता यादीवर झाला नव्हता, मात्र, दि.२३ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार भौतिकशास्त्र विषयाच्या एका वादग्रस्त प्रश्नाचे ग्राह्य धरलेले दोन पर्याय रद्द करून नवीन निकालानुसार एकच पर्याय बरोबर असल्याचे ग्राह्य धरण्यात आले. त्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची रँक बदलली. गुणांमध्येही बदल झाले.

पशुवैद्यकीय प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात आणल्यानंतर रँक बदलल्याने विद्यार्थ्यांना गोंधळ निर्माण झाला. आता महाराष्ट्रातील पशुवैद्यकीय परीक्षेचे नवे वेळापत्रक जाहीर केले आहे.

पशुवैद्यकीय प्रवेशाकरिता पूर्वीच्या वेळापत्रकानुसार अंतिम गुणवत्ता यादीची तारीख ३१ जुलै होती. ती आता १४ ऑगस्ट करण्यात आली आहे. एनटीएकडून विद्यार्थ्यांचे नवे गुणपत्रक घेऊन ही प्रक्रिया पुढे नेली जाणार आहे.

# जिल्ह्यात कर्जवाटपात जिल्हा मध्यवर्ती बँकच अव्वल

## खरीपाचे ९२ ८१८ शेतकऱ्यांना ११९१ कोटी रुपये कर्जवाटप

### खासगी, राष्ट्रीयकृत बँका ६० टक्केवरच थांबल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** खरीपाच्या पिककर्ज वाटपाला शेवटचे दोन महीने शिल्लक राहीले आहे. तर दुसरीकडे जिल्ह्यात पेरणी पुर्णता आटोपली असताना देखील खासगी आणि राष्ट्रियकृत बँकांनी मात्र ६० टक्केच्यावर कर्जवाटपच केले नाही. कर्जवाटपात जिल्हा मध्यवर्ती बँकच अव्वल असून या बँकेने आतापर्यंत ९७ टक्के कर्जवाटप केले आहे. जिल्ह्यात ३१ जुलै पर्यंत २० बँकांनी ९२ हजार ८१८ शेतकऱ्यांना १११९ कोटी ६६ लाख रूपयाचे पिक कर्जवाटप केले आहे.

लीड बँकेच्या वतीने यंदा खरीपाकरीता २ लाख २ हजार ३४० शेतकऱ्यांना १६०० कोटी रूपयांचेपिककर्ज वाटपाचे उद्दिष्ट बँकांना दिले होते. १ एप्रिल पासून कर्जवाटपाला सुरूवात करण्यात आली. कर्जवाटपात जिल्हा मध्यवर्ती बँकेने बाजी मारत सर्वाधिक ५० हजार ६०७ शेतकऱ्यांना ५९८ कोटी ३० लाख रूपयांचे कर्जवाटप केले आहे. याची टक्केवारी ९७ टक्के आहे.




त्या पाठोपाठ ग्रामिण बँकेने ७३ टक्के कर्जवाटप केले आहे. परंतु नियमीप्रमाणे यंदाही राष्ट्रीयीकृत आणि खासगी बँका कर्जवाटपात मागारल्या आहेत. ११ राष्ट्रीयिकृत बँकेने ३९ हजार ३५८ शेतकऱ्यांना ५४५ कोटी ९१ लाखांचे कर्जवाटप केले असुन याची टक्केवारी ६६ टक्के आहे खासगी ७ बँकांनी १६७८ शेतकऱ्यांना ३२ कोटी १८ लाखांचे कर्जवाटप केले आहे. याची टक्केवारी २५ टक्के आहे. खासगी आणि राष्ट्रीयीकृत बँकेने चार महिन्यांत केवळ ६० टक्केच कर्जवाटप केले आहे. अशातच खासगी तीन बँकेने कर्जवाटपाला सुरूवात देखील केली नाही. ३० सप्टेंबर ही खरीपाकरीता शेवटची तारीख दिली असली तरी जिल्ह्यात शेतीची पेरणी शंभर टक्केवर पोहचली आहे. त्यामुळे आता या बँकांची उद्दिष्पुर्ती होईल का यात शंका आहे. राष्ट्रीयीकृत व खासगी बँका शेतकऱ्यांना सहकार्य करीत नाही का असाही प्रश्न उपस्थित होत आहे. अशा बँकांवर प्रशासनाकडुन कारवाईची गरज असल्याचेही बोलल्या जात आहे.

### रब्बीकरीता ५०० कोटींचे उद्दिष्ट

जिल्ह्यात रब्बी हंगामाला खरीपानंतर सुरूवात होईल. परंतु त्याचे नियोजन करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर पासुन रब्बीच्या कर्जवाटपाला सुरूवात होणार आहे. ७४ हजार ७६६ शेतकऱ्यांना ५०० कोटींच्या कर्जवाटपाचे उद्दिष्ट २० बँकांना देण्यात आले आहे.

# मध्यरात्री माथेफिरूंनी आदेशा

## तीस गाड्या फोडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** एका दुचाकीने जाणाऱ्या तीन युवकांनी रस्त्याने जाणाऱ्या तब्बल जवळपास ३० ते ३५ गाड्या फोडल्याने शहरात एकच खळबळ उडाली. यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस यंत्रणा खळबळून जागे होत गाड्या फोडणाऱ्यांचा शोध घेत आहे.

बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास तीन युवक पंचवटी चौकातून मोफेडने निघाले यावेळी त्यांनी ज्या चारचाकी गाड्या दिसल्या त्यावर त्यांनी दगडफेक करून फोडल्या. लाचलचु पत प्रतिबंधक ऑफिसच्या समोरील इमारतीच्या पार्किंगमध्ये ठेवलेल्या गाड्यांनासुद्धा या माथेफिरूंनी लक्ष केले. हे तीनही युवक पंचवटी पासून तर तपोवन गेटच्या आत गेले. मात्र या दरम्यान ज्या काही चारचाकी गाड्या त्यांनामार्गात दिसल्या त्या त्यांनी दगड मारून फोडल्या. यात एका पत्रकाराची गाडीसुद्धा फोडण्यात आल्याचे समजते. ही घटना पोलिसांना कळताच त्यांनी माथेफिरूंचा शोध घेणे सुरू केले आहे. त्याकरिता पंचवटी ते तपोवनपर्यंतचे सिसीटीव्ही फुटेज पोलिस तपासत आहेत.




# आता मेळघाटात दरड कोसळण्याची भीती

## वाहन धारकांनी सावधान राहण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मेळघाट** मेळघाट मध्ये जोरदार अतिवृष्टी होत असल्याने शिवाझिरी ते राणी गाव मार्गावर दरड कोसळण्याची घटना झाल्याने काही तास वाहतूक बंद पडलेली होती. अनेक वर्षानंतर मेळघाटात दरड कोसळल्याची घटना घडल्याने घाटवळणावर वाहन धारकांनी सावध राहण्याची गरज आहे.



धारणी तालुक्यातील गिरीस्थानी वसलेल्या राणीगाव पोहचण्यासाठी घाटवळणाचा आणि नादुरूस्त मार्गाने जावे लागत असते. बुधवारी शिवाझिरीते राणीगाव दरम्यान घाटात पहाडाचा एक कोपरा कोसळून सडकेवर दगडांचा ढिगार लागल्याने वाहतुक बंद पडलेली होती. वाहन धारकांनीच मेहनत करून दगडांना बाजूलाकेल्यावर वाहतुक सुरू होऊ शकलेली होती. सुदैवाने कोणताहीच जनहानी झालेली नाही. – धारणी ते अकोट, हरिसाल ते अकोट, धारणी ते – बैरागड, धारणी ते परतवाडा या मार्गावरील घाट – वळणातुन प्रवास करावा लागत असतो.अश्यात दरड कोसळण्याची दाट शक्यता असल्याने सावध राहण्याची आवश्यकता आहे. प्रामुख्याने राणीगाव घाट आणि अकोट मार्गावर लॅण्ड स्काईडचा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पोलीस ठाण्यात तक्रार करण्याचे स्टेटस ला माथेफिरू युवकाने दिले अश्लील शिर्षक

## अकोल्याच्या मजूनवर राजापेठ ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** जुनी ओळख झालेल्या युवकाने एकतर्फी प्रेमातून युवतीचा ऑनलाईन पाठलाग करून सतत तिचा विनयभंग केला. वैतागून युवतीने मी पोलिसात तक्रार करेल, असा स्टेटस व्हॉट ॲपवर ठेवला. परंतु, माथेफिरू युवकाने त्या स्टेटसचा स्क्रीनशॉट काढून, त्याला अश्लिल शिर्षक देऊन परत त्याच युवतीला पाठविला. राजापेठ पोलिस ठाण्यात याबाबत अकोला येथील युवका – विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

रूपेश वखारकर, रा. अकोला असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, तक्रारकर्ती युवती ही राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहत असून आरोपी रूपेशला सन २०१४ पासून ओळखते. युवती पोस्ट ग्रॅज्यूएट उर्तीण असून तीसध्याघडीला स्पर्धा परिक्षेची तयारी करित आहेत. अशातच १७ जुलै २०२३ रोजी रूपेशने युवतीलाफेसबुकवर फ्रेन्डस रिकवेस्ट पाठविली. तो ओळखीचा असल्याने युवतीने ती एक्सेप केली. चॅटींग, मोबाइल क्रमांकाची देवाण-घेणाव झाल्यानंतर दोघांमध्ये बोलने सुरू झाले. अशाताच रूपेशने काही दिवसांपूर्वी युवतीला व्हॉट ॲपवर थेट प्रपोजचा मॅसेज पाठविले. युवतीने नकार देऊन त्याला ब्लॉक केले. तरी त्याने दुसऱ्याक्रमांकावरून युवतीला ऑनलाईन अश्लिल व धमकीचे मॅसेज पाठवायला सुरूवात केली. रूपेशच्या या त्रासामुळेयुवतीला नीट अभ्यास करता येत नसल्याने तिने मी तुझी पोलिसात तक्रार करेल, अशा मजकूराचा स्टेटस व्हॉटपवर लावला. तेव्हा रूपेशने त्या स्टेटसचा स्क्रीन शॉट काढून, त्याला अश्लिल शिर्षक देऊन परतयुवतीला पाठविला, तसेच फेसबुकवर तिच्या वॉलवर जाऊन तिलाच टॅगवशेअर सुध्दा केला. त्यामुळे युवतीने अखेर राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी रूपेशविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेने महसूल पंधरवड्याचा शुभारंभ

## राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी महसूल विभागाने काम करावे- जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती दि.२** शासकीय कार्यालयात सर्वसामान्य माणूस विविध कामे घेऊन येत असतो. याची जाणीव संबंधित कर्मचाऱ्यांनी ठेवावी. त्यामुळे संवेदनशीलपणे काम केल्यास स्वत:ची तसेच विभागाची चांगली प्रतिमा निर्माण होते. महसूल विभागातील प्रत्येकांने जबाबदारीने काम करुन राज्यात अमरावती जिल्हा प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

नियोजन सभागृहात महसूल दिनानिमित्त आयोजित महसूल पंधरवाडाचा शुभारंभ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेने केला, यावेळी ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त सचिन कलंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, अमरावती विभागाचे अपर आयुक्त गजेंद्र बावणे, अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी महसूल विजय जाधव, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार आदी उपस्थित होते.





जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, आपल्याकडे काम घेऊन येणा-या सामान्य माणसाचे समाधान करा. संवेदनशीलपणे काम हाताळल्यास चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होईल. पूर्वीच्या आणि आत्ताच्या काम करण्याच्या पध्दतीत अमुलाग्र बदल झाला आहे. शासनाचा ऑनलाईन सेवा पुरविण्यावर भर असून त्यांचा प्रत्येकांनी आत्मसाद करावे. महसूल संबंधित सर्व सेवा नागरिकांना विनाविलंब मिळेल यासाठी प्रयत्न करावे. सर्व विभागासोबत समन्वय साधून शासनाच्या महत्वाकांक्षी योजनाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा. कोणताहि लाभार्थी लाभापासून वंचित राहता काम नये. उत्कृष्ठ सेवेतून अमरावती जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी महसूल विभागाने काम करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मनपा आयुक्त श्री. कलंत्री म्हणाले की, महसूल विभाग हा शासनाचा मुख्य कणा असून शासनाच्या विविध योजनाचा लाभ व सेवा देण्यासाठी सर्वसामान्य माणसांचा संबंध येतो. त्यामुळे योजनांचा लाभ गरजूपर्यंत कसा देता येईल यासाठी महसूल विभागाने प्रयत्न करावे. आपल्या कामातून व्यापक लोकहित साधणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे महसूल पंधरवाडा कालावधीत नागरिकांच्या तक्रारी व प्रलंबित कामे निकाली काढण्यासाठी पुढाकार घ्यावा. अधिकाधिक नागरिकांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत.

शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने अधिकाधिक लोकाभिमुख होऊन कामे करावीत व महसूल पंधरवडा यशस्वी करावा. शासनाच्या विविध योजना लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रामसेवक आणि तलाठी यांनी समन्वय काम करावे, असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांनी केले. महसूल दिनानिमित्ता आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत पात्र ३ हजार ४६८ महिला लाभार्थ्यांच्या प्रकरणाला तालुकास्तीय समितीने मंजुरी प्रदान करण्यात आले असून प्रातिनिधीक स्वरुपात महिलाना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

पात्र महिलांच्या खात्यात प्रतिमाह १ हजार ५०० रुपयांचे अर्थसहाय्य जमा केले जाणार आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ठ कर्मचा-यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच ५६३ तलाठी यांना महसूल संदर्भातील कामे करण्यासाठी लॅपटॉप व प्रिंटरचे वाटप करण्यात आले.

नव्याने तलाठी पदावर नियुक्त झालेले ३३ उमेदवारांना नियुक्ती आदेश यावेळी प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अपर जिल्हाधिकारी सुरज वाघमारे यांनी केले.

संचालन श्रीकृष्ण पखाले यांनी तर आभार अनिल भटकर यांनी मानले. कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महसूल पंधरवड्यामध्ये विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवा - विभागीय आयुक्त डॉ निधी पाण्डेय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती –**

यावर्षीपासून महसूल सप्ताह ऐवजी 'महसूल पंधरवडा' साजरा केला जात आहे. या कालावधीत शासनाच्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवा असे आवाहन डॉ निधी पाण्डेय यांनी केले आहे.

राज्यस्तरीय महसूल दिन तसेच महसूल पंधरवडा व पशुसंवर्धन पंधरवडा-२०२४ चा शुभारंभ कार्यक्रम मंत्रालयातील परिषद सभागृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल आणि पशुसंवर्धन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांची प्रमुख उपस्थिती तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व विभागीय आयुक्त ,सर्व जिल्हाधिकारी आणि पशुसंवर्धन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

पंधरवड्याबाबत अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी वयोश्री, लेक लाडकी, अन्नपूर्णा, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण तसेच शेतकऱ्यांशी संबंधित विविध योजनांची चांगली अंमलबजावणी करून शासनाची चांगली प्रतिमा निर्माण करावी असे आवाहन करण्यात आले.नागरिक व ग्रामीण भागातील जनतेसाठी महसूल व पशुसंवर्धन दोखील अतिशय महत्वाचे विभाग आहेत.



महसूल पंधरवड्यामध्ये शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी महसूल विभागाने अग्रेसर राहून सर्व विभागांसह चांगले काम करावे. शासनाच्या योजना जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवून लोकाभिमूख काम करावे. जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी लोकांपर्यंत जावे. विविध उपक्रमांच्या निमित्ताने लोकप्रतिनिधी, सैनिकांचे कुटुंबीय, महाविद्यालयीन युवक, वयोवृद्ध नागरिक , महिला समाजातील विविध घटक यांना सामावून घेत महसूल पंधरवड्याचा हा उपक्रम यशस्वी करावा.असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले.

# ग्रामपंचायत कार्यालय मध्ये विष प्राशन करून केला आत्महत्येचा प्रयत्न

## मी तयार केलेल्या कागदपत्रावर सही देण्यास ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांचा नकार

विदर्भ प्रजासत्ताकदि.२ दर्यापुर २दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्येच अमर वानखडे या इसमाने सकाळी दहाच्या सुमारास वीस प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे स्वत: व्हिडिओ काढून आत्महत्या करत असल्याचे सांगितले आहे तसाच सोशल मीडियावर अपलोड सुद्धा करण्यात आलेला आहे. दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथील ग्रामपंचायत मधील लोकांच्या विविध समस्या संदर्भात दर्यापूर पंचायत समिती कार्यालयावर त्या गावातील लोक धडकले सुद्धा होते. त्याच माध्यमातून वडनेर गंगाई येथील अमर वानखडे या इसमाने ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच व चंद्रशेखर हुतके या दोघांचे नाव घेऊन अमर वानखडे यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला आहेसविस्तर वृत्त असे की अमर वानखडे हा ग्रामपंचायत वडनेर गंगाई येथील रहिवासी असून आपल्या विविध मागण्या संदर्भात ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांच्याकडे सही मागण्याकरिता वारंवार जात असून सुद्धा ते मला सही देण्यास नकार देत आहेत माझ्या कुठल्याच गोष्टीचा खंडन सुद्धा करत नाहीत माझ्या नावाने यांनी येवदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा सुद्धा दाखल केलेला आहे आहे, आज दिनांक रोजी मी माझ्या मागण्या घेऊन ग्रामपंचायत कार्यालयामध्ये गेलो असता मला आज सुद्धा उडवा उडवी चे उत्तरे देण्यात आलेली आहे म्हणून मी आज रोजी ग्रामपंचायत कार्यालय वडनेर गंगाई येथे विष प्राशन करून आत्महत्या करीत आहे माझ्या जिवित्वाला काही कमी जास्त झाल्यास सर्वस्वी जबाबदार ग्रामपंचायत सरपंच व चंद्रशेखर हुतके सर्वस्वी जबाबदार राहतील असा आरोप अमर वानखडे यांनी केलेला आहे पुढील तपास येवदा पोलीस स्टेशन करीत आहे.



> अमर वानखडे हा इसम आम्हाला वारंवार आत्महत्या करण्याच्या धमक्या देत होता सदर घटनाक्रम माझ्यासमोर झालेला नसून मला याच्याबद्दल काहीच माहिती नाही
>
> **सरपंचगौकर्णा सुभाषराव इंगळे**
>
> वडनेर गंगाई सदर इसम माझ्यासमोर पडलेला होता म्हणून मी पोलीस स्टेशन यांना फोन केला आत्महत्या का करत आहे मला माहिती नाही
>
> **सचिवविलास यादव** ग्रामपंचायत कार्यालय

# अमरावती जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांवर अन्याय, मुख्यमंत्री तीर्थ योजनेतून वगळले

## आमदार ड.यशोमती ठाकूर यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** – राज्य सरकारने नुकतीच मुख्यमंत्री तीर्थ दर्शन यात्रा पावसाळी अधिवेशनात जाहीर केली आणि ही यात्रा लगेचच लागू होईल अशी घोषणाही केली. या यात्रेसाठी राज्यभरातील तीर्थक्षेत्रांसह देशभरातील तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आलेला आहे. यात देशातील ७३ आणि महाराष्ट्रातील ६६ तीर्थक्षेत्रांचा समावेश झाला असला तरी अत्यंत लोकप्रिय आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरावती जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांचा मात्र, सरकारने जाणून-बुजून समावेश केला नसल्याचा आरोप काँग्रेसच्या आमदार ड .यशोमती ठाकूर यांनी केला आहे. मात्र, या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन यात्रेत राज्यासह देशातील १३९ तीर्थक्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे. देशातील ६६ तीर्थक्षेत्रांमध्ये नागपूर दीक्षाभूमी यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथील गणपती मंदिर नांदेड येथील गुरु गोविंद साहेब गुरुद्वारा, नांदेड जिल्ह्यातील रेणुका देवी मंदिर माहूर येथील मंदिर यांचा या यादीत समावेश करण्यात आलेला आहे तर देशातील सुवर्ण मंदिर अयोध्येतील राम मंदिर वैष्णोदेवी



अमरनाथ यात्रा ओरिसा येथील जगन्नाथ पुरी यांचाही समावेश केला आहे. मात्र, अमरावती जिल्ह्यातील अंबादेवी, एकवीरा देवी, महानुभाव पंथीयांची काशी मानलं जाणार रिद्धपूर तसेच रखुमाईचा माहेर मांडलं जाणार तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर यांचा मात्र यात समावेश करावा अशी मागणी ठाकूर यांनी केली आहे.

# मोर्शीच्या जयस्तंभ चौकातील जुनी इमारत कोसळली

## मलब्याखाली दबलेल्या दोन मजुरांना सुखरूप काढले बाहेर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२. मोर्शी** येथील गजबजल्या जयस्तंभ चौकात जवळपास ४० ते ५० वर्षांपासूनची पांढरी माती व सिमेंटने बांधकाम असलेली इमारत अचानक खाली कोसळली. इमारतीमध्ये हार्डवेअरचे पाईप काढत असलेले दोन मजूर मलब्याखाली दबले होते. परंतु उपस्थित नागरिकांनी लगेच धाव घेऊन त्यांना बाहेर काढल्याने जीवित हानी टळली. ही घटना १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. सुभाष कुमरे (वय ६५) व संजय मगरते (वय ४०) हे मलब्याखाली दबल्याने किरकोळ जखमी झाले असून मोर्शी उपजिल्हा रूग्णालयात उपचार घेत आहेत.

मोर्शी-वरूड मार्गावर असलेल्या जयस्तंभ चौक येथील मार्केट लाईनच्या मागे चाळीस ते पन्नास वर्षांपासूनची इमारत उभी होती. या इमारतीमध्ये हार्डवेअरच्या दुकानाचा माल ठेवला जात होता. या इमारतीचा वापर गोदामासारखा केला जात होता. १ ऑगस्ट रोजी सकाळी सुभाष कुमरे व संजय मगर्दे हे या इमारतीमध्ये असलेले पीव्हीसी पाईप काढत असतांनाअचानक इमारत कोसळली. यामुळे हे दोन्ही मजुर मलब्याखाली दबल्या गेले. यावेळी उपस्थित असलेले अ. आरिफ अ.रफिक व भाऊराव सयाम यांनी त्यांना तात्काळ या दोन्ही मजुरांना बाहेर काढल्यामुळे जीवित हानी टळली. घटनास्थळी दाखल झालेले सामाजिक कार्यकर्ते निलेश रोडे यांनी एमएसईबीचे कनिष्ठ अभियंता सतीश देऊळकर यांना याबाबतची माहिती देऊन तात्काळ या ठिकाणचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आला.



# 'नवीन शिक्षण धोरण, ग्रामीण विद्यार्थ्यांचे मरण'

## सावित्रीबाई फुले जिल्हा परिषद शाळा वाचवा अभियान राबविणार

### राम चव्हाण यांची पत्रपरिषदेत माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१अमरावती–**

आदिवासी अनुसूचित जाती जमाती ओबीसीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा षडयंत्र मनुवाद्यांचे असून ते हाणून पाडण्यासाठी 'सावित्रीबाई फुले जिल्हा परिषद शाळा वाचवा अभियान', 'नवीन शिक्षण धोरण ग्रामीण विद्यार्थी मरण' असल्याने सर्वसामान्यांना जागृत करण्यासाठी ११ ऑगस्टपासून अमरावती जिल्ह्यासह राज्यभरात अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राम चव्हाण यांनी जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे पत्र परिषदेत दिली.

राज्य सरकार जिल्हा परिषदेच्या शाळा दत्तक देऊन समूह शाळा परिसरातील कमी पटसंख्येच्या लहान शाळा बंद करून मोठ्या गावातील शाळेत समाविष्ट करण्याचे काम सुरू करणार आहे.याबाबत पालक अजूनही गंभीर दिसून येत नाही. शाळा दत्तक देऊन समूह शाळा होणे म्हणजेच आपली हक्काची शाळा बंद करून मानवांचा मूलभूत हक्क हिरावून घेण्याचे काम सरकार करीत आहे.

संविधानाच्या कलम २४५ चा अवमान आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा बंद होणे हे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी धोक्याची घंटा आहे. वेळीच सावध करण्याकरिता अभियान राबविणार असल्याची माहिती राम चव्हाण यांनी दिली.

पत्रपरिषदेला सावित्रीबाई फुले जिल्हा परिषद शाळा वाचवा अभियान आयोजन समितीचे सचिव मुरलीधर डहाणे, विलास पवार, अर्जुन युवनाते, ॲड. रश्मी तायडे, अशोक चव्हाण, रोहित झाकडे उपस्थित होते.

# शाळा- महाविद्यालयांमधील देखावा ठरलेल्या तक्रार पेट्याचे केले पूजन

## पोलिसांचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांचे अभिनव आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** अमरावती शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनींसाठी लावलेल्या तक्रार पेट्या या केवळ देखावा व शोभेच्या वस्तू ठरल्या असून याकडे पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांच्या नेतृत्वात अभिनव आंदोलन करून केवळ देखावा ठरलेल्या तक्रार पेट्यांची पूजन विद्यार्थिनींच्या उपस्थितीत करण्यात आले .

अमरावती शहरात गेल्या काही वर्षांपूर्वी शाळकरी मुलीं संदर्भात घडलेल्या घटनांची दखल घेत अमरावतीचे तत्कालीन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिलेल्या निर्देशानुसार पोलीस विभागामार्फत शिक्षक व प्राचार्यांच्या सहकार्याने शहरातील प्रत्येक शाळा व महाविद्यालयांमध्ये तक्रार पेट्या लावण्यात आल्या होत्या छेडखानी व अन्य घटनांबाबत आई वडील किंवा पोलिसांकडे थेट तक्रार न करू शकणाऱ्या शाळकरी मुलींनी आपली तक्रार त्या तक्रार पेटी टाकावी ,पोलीस विभागामार्फत ठरलेल्या वेळी ती तक्रारपेटी उघडून त्यामधील तक्रारींची शहानिशा करीत संबंधितांवर कारवाई करून भयभीत मुलींना दिलासा मिळावा आणि त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी हा उदात्त हेतू त्या मागील होता .परंतु गेल्या दोन-तीन वर्षापासून पोलिसांनी त्या तक्रार पेट्यांकडे दुर्लक्ष केल्याने संपूर्ण उद्देशालाच हरताळ फासल गेला आणिविविध शाळा व महाविद्यालयांमध्ये लावलेल्या तक्रार पेट्या केवळ देखावा आणि शुभेच्छा वस्तू ठरल्या असा आरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केला आहे.



बुधवारी राजापेठ परिसरात एका महाविद्यालयीन युवतीवर झालेल्या हल्ल्यामुळे विद्यार्थिनींमध्ये आपली सुरक्षितता धोक्यात आल्याची भावना निर्माण झाली आहे .स्वतःला असुरक्षित समजणाऱ्या विद्यार्थिनींना तक्रारीचे थेट माध्यम उपलब्ध व्हावे यासाठी पुन्हा तक्रारपेटीचा उपक्रम सुरू व्हावा आणि पोलीस विभागामार्फत त्या नियमित उघडून त्यामध्ये येणाऱ्या तक्रारींवर तत्काळ कारवाई होऊन गंभीर घटना घडण्यापूर्वीच त्यावर पायबंद बसावा याकडे पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी बुधवारी अभिनव आंदोलन केले. सुनील खराटे यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन केवळ देखावा ठरलेल्या तक्रार पेट्यांचे विद्यार्थिनींच्या उपस्थितीत पूजन केले. यावेळी विकास शेळके, निलेश सावळे, संदीप इंगोले, यश वानखडे, रिंकू पंचवटे आणि प्रत्येक शाळा कॉलेज मधील विद्यार्थिनी व शिक्षक आदी उपस्थित होते

> **अन्यथा तीव्र आंदोलन करणार**
>
> पोलीस प्रशासनाने या तक्रार पेट्या नियमित उघडून त्यामध्ये आलेल्या तक्रारींवर तत्काळ कारवाई करीत असुरक्षित समजणाऱ्या विद्यार्थिनींना दिलासा द्यावा आणि त्यांना भयमुक्त वातावरण निर्माण करून द्यावे अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी पोलीस विभागाकडे केली आहे. या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास शिवसेनेकडून लवकरच मोठे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

# नागपुरातील वास्तूकलेला साजेसे ‘नियोजन भवन’

## उपमुख्यमंत्री देवेश फडणवीस यांच्या हस्ते उद्याला होणार लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

अनेक वर्षांपासून रखडलेली जिल्हा नियोजन भवनाचे काम अखेर पूर्ण झाले. नागपुरातील वास्तू कलेच्या लौकिकाला साजेशी अशी ही वास्तू असून शुक्रवारी नागपूरचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेश फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात येणार आहे.



नवीन जिल्हा नियोजन भवनात पहिल्या माळ्यावर जिल्हा नियोजन अधिकारी, नागपूर यांचे कार्यालय, सभागृहात व्यासपीठावर २८ मान्यवरांची आसन व्यवस्था व अधिकारी/प्रतिनिधी व इतर गणमान्य व्यक्तीकरिता २९४ आसन व्यवस्था आहे. दुसऱ्या माळ्यावर सभागृहाची व्यवस्था आहे. पालकमंत्री, जिल्हाधिकरी व जिल्हा नियोजन अधिकारी यांना स्वतंत्र दालने या ठिकाणी आहेत. तळ माळ्यावर प्रतीक्षालय व दुसऱ्या माळ्यावर ग्रंथालयाची व्यवस्था आहे. नियोजन भवनाचे लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते २ ऑगस्ट रोजी होत आहे. इमारतीच्या लोकार्पणानंतर लगेचच जिल्हा नियोजन समितीची बैठक होणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी होणारी ही बैठक असल्याने त्यात विविध मुद्यांवर सत्ताधारी व विरोधीपक्षाच्या सदस्यांमध्ये वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

लोकार्पणापूर्वी विविध योजनांच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात लाभाचे प्रमाणपत्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरीत केले जाणार आहेत. यात जिल्ह्यातील ५ लाभार्थ्यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत बागायती/ कोरडवाहू शेतीचे वाटप, स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकातील पात्र लाभार्थ्यांना १५ टक्के निधी लाभ, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत दोन तृतीयपंथीयांना प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूकीचे आदेश, शिवभोजन थाळी केंद्राचे तृतीयपंथीयाला वाटप, जिल्ह्यातील तालुकास्तरावरील १४ ठिकाणच्या तालुका कामगार सुविधा केंद्राचे लोकार्पण, अग्निशमन वाहन, किडा संकुल येथे कबड्डी, खो-खो खेळासाठी मॅट पुरविणे, नझूलपट्टा वाटप केले जाणार आहे. जिल्हा नियोजन अधिकारी राजेश गायकवाड हे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे संचालन करणार आहेत.

**नागपूर कॉफी टेबल बुकचे अनावरण**

नागपूर जिल्हा व महानगराला ऐतिहासिक वारश्यासह विपूल नैसर्गिक साधन संपत्ती लाभलेली आहे. या समृध्दीसह महानगरातील ऐतिहासिक किल्ला, श्रीमंत भोसले यांचा राजवाडा, विधानभवन, मा. उच्च न्यायालय, जनरल पोस्ट ऑफिस, विभागीय आयुक्त कार्यालय, राजभवन, भारतीय रिजर्व्ह बँक, दीक्षाभूमी आदी स्थळांच्या प्रेरणेला अधोरेखित करणारे ह्दयस्थ नागपूर या कॉफी टेबल बुकचे अनावरण फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे कॉफी टेबल बुक साकारलेले आहे.

# ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण देणार नाही, असे सरकारने सांगितले आहे तायवाडे म्हणाले आम्ही लक्ष ठेवून..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नागपूर**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिले जाणार नाही असे आश्वासन राज्य सरकारने आम्हाला दिले आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न सरकारने कसा सोवडवावा हा त्यांचा प्रश्न आहे. आम्ही त्यावर लक्ष ठेवून आहोत, असे विधान राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी केले.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ९ वे राष्ट्रीय अधिवेशन ७ ऑगस्टला पंजाबमधील अमृतसरला होत आहे. त्यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. तायवाडे बोलत होते. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिला जाऊ नये. ही आमची भूमिका आहे. तसेच मराठा समाजातील लोकांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यासही आमचा विरोध आहे. राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसी



प्रवर्गातून आरक्षण दिले जाणार नाही. असे लेखी आश्वासन आम्हाला दिले आहे. आता राहता राहिला मुद्दा जरांगे पाटील यांच्या मागणीचा. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न कसा सोडवायचा हे त्यांनी ठरवावे. आम्हाला त्यात पडायचे कारण नाही. परंतु आम्ही राज्य सरकारने शब्द पाळावा. यावर आम्ही लक्ष ठेवून आहोत, असेही तायवाडे म्हणाले. पत्रकार परिषदेला शरद वानखेडे, सुषाम भड उपस्थित होते.

अमृतसर येथील अधिवेशनात ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना, ओबीसी क्रिमिलेअर मर्यादावाढ, स्वतंत्र ओबीसी मंत्रालय, आरक्षणासाठी ५० टक्क्यांची अट रद्द करा यासह समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने मंथन होईल. या दरम्यान मान्यवाराच्या हस्ते ‘लढा संविधानिक हक्काचा’ या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.

अधिवेशनाचे उद्घाटन सकाळी ११ वाजता राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या हस्ते होईल. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा आणि युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पंजाब विधानसभेचे उपसभापती जय क्रिष्ण सिंग, महाराष्ट्र विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, महाराष्ट्रातील ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे, क्रिकेटपटू तथा राज्यसभा सदस्य हरभजन सिंग, पंजाबमधील ‘आप’चे आमदार संतोष कटारिया, हरयाणाचे माजी खासदार राजकुमार सैनी यांची प्रमुख उपस्थित राहील.

### ‘जात’ विचारण्याचा निषेध

लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनी संसदेत जातनिहाय गणना करण्याची मागणी केली. यावरू भाजपचे माजी मंत्री अनुराग ठाकूर यांनी ‘ ज्यांना आपली जात माहिती नाही ते जातनिहाय गणना’ करण्याची मागणी करीत आहेत, असे आक्षेपार्ह विधान केले. तर ठाकूर यांचे संसदेतील भाषण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्स (ट्विट) वर टाकून ठाकूर यांना शाब्बाशकी दिली. अशाप्रकारे जातनिहाय गणना करणाऱ्यांना जात विचारून हिनवण्याच्या प्रकाराचा निषेध राष्ट्रीय ओबीसी महासंघ करीत असल्याचे डॉ. बबनराव तायवाडे म्हणाले.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी इंडिया पोस्ट पेमेंट बँकेमार्फत खाते उघडण्याची सुविधा; केवळ ५ मिनीटात उघडले जाते खाते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

राज्य शासनाने महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात प्रतिमाह १ हजार ५०० रुपयांचे अर्थसहाय्य जमा केले जाणार आहे. त्यासाठी महिलांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. यासाठी इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेने अवख्या पाच मिनीटात २०० रुपये शुल्क भरुन बँक खाते उखडले जाते. या सुविधाचा योजनेंतर्गत पात्र महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.




मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील आणि कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजाराच्या आत असलेल्या महिलांना आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर योजनेचा लाभ दिला जाणार आहे. लाभाची रक्कम प्रतिमाह केवळ बॅंक खात्याद्वारे अदा केली जाणार आहे. योजनेसाठी महिलांच्या नावांची नोंदणी जिल्हाभर मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. नोंदणी करतांना महिलांना बँक खात्याची झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.पोस्ट पेमेंट बँकेत अगदी काही वेळात आणि सहजपणे खाते उघडल्या जात असल्याने महिला हे खाते उघडण्याला पसंती देत आहे. भारतीय डाक विभागाच्या इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे जाळे संपुर्ण जिल्ह्यात अगदी गाव पातळीपर्यंत पसरलेले आहे. जिल्ह्यात सुमारे ४५४ पोस्ट ऑफिस आहे. त्यात ४१२ ग्रामीण भागात तर ४२ शहरी भागात कार्यरत आहे. या सर्व पोस्ट कार्यालयातून इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे कार्य चालते. या बँकेत अवख्या पाच मिनीटात २०० रुपये शुल्क भरुन बँक खाते काढता येते.

जिल्ह्यातील सर्व पोस्टमनकडे डिपार्टमेंट मोबाईल आणि बायोमेट्रिक मशीन देण्यात आलेल्या आहेत. या मशिनच्या आधारे लाभार्थ्यांची अंगठा लावून पडताळणी केली जाते आणि खाते उघडून दिले जातात. खाते काढण्यासाठी पोस्ट पेमेंट्स बँकेत कोणत्याही प्रकारचे कागदपत्र द्यावे लागत नाही, फक्त आधार क्रमांक आणि मोबाईल सोबत असावा लागतो. जिल्ह्यात इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे जवळपास २ लाख ५० हजारापेक्षा जास्त ग्राहक आहेत. त्यात आता १५ हजार लाडक्या बहिणींची भर पडली आहे.

### खाते अन्य योजनेसाठीही उपयुक्त

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेचे खाते मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेव्यतिरिक्त पीएम किसान योजना, रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना, ज्येष्ठ नागरिकांना निराधार योजना इत्यादीसाठी उपयुक्त आहे. लाडकी बहीण योजनेसाठी शासनाने देखील पोष्ट पेमेंट्स खात्याला मान्यता दिली असून महिलांनी खाते काढण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची ‘संचीता’ ठरली जिल्ह्यातील पहीली लाभार्थी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनेमधील एक महत्वाकांक्षी योजना म्हणजे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आहे. या योजनेतंर्गत कु. संचिता कोकर्डे या प्रशिक्षनार्थीची निवड करण्यात आली असून अमरावती जिल्ह्यातील पहिली लाभार्थी ठरली आहे. कु. कोकर्डेला जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. विविध शासकिय, निमशासकिय कार्यालये, खाजगी आस्थापना व महामंडळांनी आतापर्यंत १ हजार ४७५ पदे महास्वयंम वेबपोर्टलवर अधिसुचीत झालेली आहे. अधिसूचित झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यामधून कु.संचिता कोकर्डे हिची स्कील/मौखीक मुलाखतीमधून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र येथे प्रशिक्षनार्थी म्हणून निवड करण्यात आली असून ती जिल्ह्यातून पहिली लाभार्थी ठरली आहे.

युवक, युवतींना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची क्षमता वाढविण्यासाठी कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक अहर्ताप्रमाणे बारावी पासकरिता ६ हजार रुपये, आयटीआय किंवा पदवीकाधारकासाठी ८ हजार व पदवीधर किंवा पदव्यूत्तर करिता १० हजार रुपये शासनाकडून विद्यावेतन दिले जाणार आहे. या कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने आहे.

**पात्रता**

उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा, उमेदवारांचे किमान वय १८ ते ३५ वर्ष असावे, शैक्षणिक पात्रता किमान बारावी पास, आयटीआय, पदविका, पदवीधर, पदव्युत्तर असावी. शिक्षण चालू असलेले उमेदवार पात्र असणार नाही, उमेदवारांची आधार नोंदणी असावी. उमेदवारांचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवारांने विभागाच्या hrrqt://rojgar.maharwê$am.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. अधिक माहीतीकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्र, शासकिय तांत्रिक विद्यालय परिसर, उस्मानिया मस्जिद जवळ, बस स्टॅण्ड रोड, अमरावती येथे प्रत्यक्ष संपर्क साधवा. किंवा मो. क्र. ८६०५६५४०२५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# आता ....अमरावतीकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली : धरणात ७० टक्के जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आजअखेर एकूण ४२६ मिमी पावसाची नोंद झाली. धरण ७०.१० टक्के इतके भरले आहे. गेल्या काही दिवसांपासून धरण क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे किमान आता पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे.जिल्ह्यात सिंचन तसेच पिण्याच्या



पाण्यासाठी जीवनदायनी ठरलेल्या अप्पर वर्धा धरण पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस पडल्याने धरणात ३९६.०५ दशलक्ष घनमीटर म्हणजे ७०.२२ टक्के पाणीसाठा झाला आहे. अप्पर वर्धा धरणाच्या प्रकल्प अहवालात मंजूर ५६४ दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठ्यापैकी ७७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा अमरावती, बडनेरा, मोर्शी, वरूड, नांदगाव पेठ, हिवरखेड आणि ११ खेडी, लोणी-जरूड आणि १४ खेडी, मोर्शी ७० गावे पाणी पुरवठा योजनेसाठी संकल्पित आहे. सिंचनासाठी २०० दलघमी पाणीसाठा आरक्षित आहे. आतापर्यंत ८२ हजार हेक्टर क्षेत्रात सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत अप्पर वर्धा धरणात ४५० दलघमी म्हणजे ७९.८३ टक्के पाणीसाठा झाला होता. गेल्यावर्षीपेक्षा यंदा कमी पाणीसाठा असला, तरी तो पेयजलासाठी पुरेसा आहे.

# जिल्ह्यात पावसाने घेतला सात जणांचा बळी : २३६ हेक्टर वरील पिकांचे नुकसान८५२ घरांची पडझड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्ह्यात मान्सूनला सुरूवात झाल्यानंतर १ जून ते २६ जुलै या दोन महिन्याच्या कालावधीत नैसगिक आपत्तीचा मोठा फटका जिल्हावासीयांना बसला आहे. या दरम्यान ७ जण पुरात वाहून गेले असून एकाचा वीज पडून मृत्यू झाला आहे. याशिवाय ३९ जनावरे दगावली आहे. अतिवृष्टीमुळे ८५२ घरांची पडझड झाली असून २३६





हेक्टरवरील पिकांचे ३३ टक्केच्यावर नुकसान झाले आहे.जूनमध्ये सरासरी पाऊस कमी असला तरी काही भागात अतिवृष्टी देखील झाली आहे. जुलैमध्ये मात्र शंभर टक्केच्यावर पाऊस बरसला आहे. त्यामुळे नदी, नाले ओव्हरफ्लो झाले नसले तरी वाहत्या आणि रिपरिप पावसाचा फटका नागरिकांना सहन करावा लागला. या दोन महिन्यात अमरावती तालुक्यातील सहा तर धामणगाव रेल्वे तालुक्यातील एक अशा सात जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ५ जण पुरात वाहून गेले तर एकाचा वीज पडून मृत्यू झाला आहे. ३९ जणावरे देखील या दरम्यान दगावली आहे. यातील १० जनावरे पुरात वाहून गेल्याने दगावली असून २६ जनावरांचा वीज पडून मृत्यू झाल्याची नोंद घेण्यात आली आहे. या पावसामुळे घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. यामध्ये २१ घरांची पूर्णता, ७८६ घरांची अंशता, ४५ गोठे अशा ८५० घरांची पडझड झाली आहे. १२ तालुक्यातील १४३ गावांना नैसगिक आपत्तीर्ची फटका बसला आहे. यामध्ये दोन शहरांचा समावेश आहे. त्यामुळे ६६८ कुटुंबातील ११०७ व्यक्ती बाधित झाले आहेत. ६ जण जखमी झाल्याची माहिती असून अचलपूर तालुक्यातील ४३० हेक्टरवरील जमीन खरडून गेली आहे.

# बंद असलेल्या सात सिटी बसेस चे स्पेअर पार्ट शहरात मिळेना : शहरातील बस फेऱ्यांवर परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

महापालिकेच्या २४ पैकी७ शहर बसेस सध्या नादुरुस्त असून, केवळ १७ बसेस रस्त्यावर धावत आहेत. त्या नादुरूस्त बसेसचे सुटे भाग (स्पेअर पार्ट) बाजारात सहजासहजी उपलब्ध होत नसल्याने बस जागीच उभ्या असल्याची माहिती आहे. परिणामी, सदर बसेस रस्त्यावर धावण्यास असमर्थ असल्याने सध्या रस्त्यावर धावत असलेल्या बसेसवरच प्रवाशांचा अतिरिक्त ताण येतअसल्याचे चित्र आहे.महापालिकेचया कंत्राटदाराकडील शहर बसेस बीएस- ४ श्रेणीच्याच जुन्या बसेस असून, सद्यस्थितीत सर्वत्र बीएस-६ श्रेणीच्या बसेस रस्त्यावर धावत आहे. त्यामुळे महापालिकेच्या बसेसचे सुटे भाग खराब झाल्यास ते नागपूर किंवा मुंबईतील खुल्या बाजारातूनच खरेदी करावे लागतात. स्थानिक पातळीवर ते सुटे भाग मिळत नसल्याने सहा ते सात बसेस सध्या तशाच उभ्या आहेत. त्यामुळे शहरातील शहर बस फेऱ्या ही कमी झाल्या असून, प्रवाशांची गैरसोय होत आहे.

# शाळा सुंदर, टापटीप बनवा; ५१ लाखांचे बक्षीस मिळवा

## अभियान ५ ऑगस्टपासून : उपक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

शालेय प्रशासनाच्या बळकटीकरणास चालना देणे तसेच शैक्षणिक संपादणूक या घटकाच्या वृद्धीस प्रोत्साहन देण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक अभियानाचा दुसरा टप्पा ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२४ या कालावधीत सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. यात शाळा सुंदर व टापटीप बनवून लाखोंचे बक्षीस मिळविता येणार आहे.




शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे स्पर्धात्मक अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांकरिता १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ या कलावधीत राबविण्यात आले. या अभियानास विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच माजी विद्यार्थी, पालक व शिक्षक प्रेमी नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला होता.

यात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण आणि क्रीडा इत्यादी घटकांबद्दल जागृतीकरून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. यात जिल्ह्यातील बहुतांश शाळांनी सहभाग नोंदवित शाळांमधील कार्यकतृर्वाची पावती दिली होती. शासनाने आता दुसऱ्या टप्प्यातून हे अभियान सुरू केले आहे.

### राज्यस्तरावर पहिले बक्षीस ५१ लाख रुपयांचे

राज्यस्तरावरील प्रथम, द्वितीय, व तृतीय क्रमांकासाठी निवडलेल्या शाळांना अनुक्रमे ५१ लाख, ३१ लाख आणि २१ लाख रकमेचे पारितोषिक दिले जाणार आहे.तालुकास्तर प्रथम ३ लाख, द्वितीय २ लाख व तृतीय शाळेस १ लाख रुपये. जिल्ह्यात पहिला क्र.११ लाख, दुसरा ५ लाख व तिसऱ्या क्रमांकाला ३ लाख रु आहे.

### असे मिळणार गुण

शाळांची पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरणांची अंमलबजावणी आणि शैक्षणिक संपादणूक या तीन मुद्यांच्या आधारे गुणांकन करण्यात येणार आहे. पायाभूत सुविधांमध्ये एकूण ३२ निकषांच्या आधारे ३३ गुण आहेत. शासन ध्येयधोरण अंमलबजावणी यात एकूण ३९ निकषांच्या आधारे ७४ गुण देण्यात येणार आहेत.

# एक महिना उलटला तरी 'लाडके भाचे' गणवेशा पासून वंचित

## तिवसा तालुक्यातील पालक वर्ग तथा विद्यार्थी संभ्रमात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२तिवसा**

समग्र शिक्षा अंतर्गत शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून पहिली ते आठवीपर्यंत्या च्या विध्यार्थ्यांना गणवेश्याचे दोन जोड दिले जाणार आहे.शाळेच्या पहिल्याच दिवशी विध्यार्थ्यांना हातात गणवेश द्या,असे शासना कडून बोलल्या जाते.मात्र आता शाळा सुरु होऊन १ महिना उलटूनही विध्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले नाही.अशातच महीला आर्थिक विकास महामंडळा कडून गणवेश कधी शिवले जाणार



आहे,कधी वाटप होणार आहे.हा एकच प्रश्न आहे.एकही मूल शिक्षणा पासून वंचित राहिले नाही पाहिजे म्हणून या उदात्त हेतूने शासनाने गणवेश पुरविण्याच्या धोरणात बदल यावर्षी पुन्हां यावर्षी गणवेश पुरविण्यासाठी धोरणात मोठा बदल करण्यात आला आहे.एक राज्य, एक गणवेश धोरणा नुसार २०२४-२०२५ शैक्षणिक वर्ष्यापासून एक नियमित गणवेश संच महीला आर्थिक महामंडळा च्या माद्यमातून स्थानिक महीला बचतगटा तर्फे शिलाई करून पुरविणार आहे.शैक्षणिक वर्ष्यापासून स्काऊट व गाईड विषयास अनुरूप एक गणवेश संच संबधीत शाळा व्यवस्थापन समिती स्थरावरून शिलाई करून पुरविण्यात येणार आहे.पहिली ते आठवी विध्यार्थ्यांच्या पालकांवर शिक्षणाचा आर्थिक बोजा बसू यासाठी शासनाने पुस्तकाचे व गणवेश वाटप केले जाते.मात्र आतापर्यंत तालुक्याला गणवेश मिळाला नाही असा प्रश्न पालकांना पडला आहे.

# चर्चा सत्रातील उत्कृष्ट कामगिरीकरिता वैदेही काळे सर्वोत्कृष्ट विद्यार्थी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथील तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. वैदेही विनय काळे हिने २७ जुलै २०२४ रोजी फादर मुलर मेडिकल कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, मंगलोर, कर्नाटक तर्फे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील रिसर्च स्पर्धेमध्ये पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत व्दितीय क्रमांक व ६०००/- रूपयांचे रोख पारितोषिक जिंकले आहे. तसेच चर्चासत्रातील तिच्या उत्कृष्ठ कामगिरीकरिता 'सर्वोत्कृष्ट विद्यार्थी' पुरस्काराची ती मानकरी



ठरली. संपूर्ण भारतातून विविध शासकीय, निमशासकीय व स्वायत्त विद्यापीठ कॉलेजेस मधून विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

वैदेहीच्या महत्वाच्या योगदानामुळे महाविद्यालयाचे नाव राष्ट्रीय स्तरावर उंचावले गेले असल्याने अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ती आपल्या यशाचे श्रेय श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री हर्षवर्धनजी देशमुख व सन्माननीय कार्यकारीणी सदस्य, महाविद्यालयाचे अधिष्ठाता, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मिळालेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्यल कम्युनिटी मेडिसिनचे विभाग प्रमुख डॉ. अजय जावरकर, प्रा.डॉ. प्रिया वरभे व संपूर्ण कम्युनिटी मेडिसीनचे प्राध्यापक यांना देते. तसेच तिला प्रा. विनय काळे, डॉ. प्रतिभा काळे, डॉ. अपूर्व काळे, डॉ. स्वप्निल मोहोड, डॉ. श्रीकांत शेगोकार, डॉ. प्रवीणा शेगोकार (काळे) व भाऊ विनम्र काळे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# अर्जात दुरुस्तीसाठी 'लाडक्या बहिणी'ला एकच संधी!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या महत्त्वाकांक्षी योजनेचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरु आहे. ३१ जुलै अखेरपर्यंत जिल्ह्यातून १ लाख ५२ हजार ३२७ महिलांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी ३ हजार ५६४ अर्जात त्रुटी निघाली आहे. दुरुस्तीसाठी एकच संधी मिळणार असून त्यानंतर अर्जात त्रुटी राहिल्यास लाभापासून वंचित राहावे लागू शकते.

जून महिन्यात राज्य शासनाने महिलांच्या खात्यात थेट दीड हजार रुपये जमा करण्याची तरतूद असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनासुरु केली. यासाठी ३१ जुलैअखेर १ लाख ५२ हजार ३२७ अर्ज आले आहेत. १ लाख ११ हजार ६९२ अर्ज तपासणीमध्ये आहेत. आतापर्यंत २५ अर्ज नामंजूर झाले असून ३ हजार ५६४ अर्ज त्रूटी पूर्ततेसाठी परत




### असा भरा अर्ज

ज्या इच्छुक पात्र लाभार्थीनी अद्याप अर्ज भरले नसल्यास त्यांनी https://ladakibahin.maharashtra.gov.in/signup या संकेतस्थळावर क्रियेट अकांउट वर क्लीक करून आपले अर्ज भरावेत. ज्यांना स्वतः अर्ज भरणे जमणार नाही त्यांनी अंगणवाडी सेविका, अंगणवाडी पर्यवेक्षीका, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/ आदिवासी), ग्रामसेवक, वार्ड अधिकारी, सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार केंद्र, नगरपालिका / नगरपंचायतीचे मदत केंद्र, अशा वर्कर, बचत गटाचे समूहसाधन व्यक्ती या शासनाच्या अधिकृत प्रतिनिधींकडून किंवा केंद्रावरून अर्ज भरून घ्यावे.

पाठविण्यात आले आहेत. अर्ज पडताळणी प्रक्रियेत त्रूटी पूर्ततेसाठी लाभार्थी महिलांना मोबाईवर संदेश पाठविण्यात येत आहेत.संदेश प्राप्त होताच संबंधित महिलांनी आवश्यक त्रुटीची पूर्तता करण्याची संधी त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. ही संधी एकवेळेसाठीच असल्याने मिळणार त्रुटीची पूर्तता काळजीपूर्वक करावी.

# टेलर, गवंड्यांना नाही मिळणार १५ हजार रुपयांचे साधन किट

## प्रतिदिन विद्यावेतनासह प्रमाणपत्र : प्रशिक्षण काळात दिला जायचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

सर्वसामान्य नागरिकांना पाठबळ देण्यासाठी सरकार विविध योजना राबवत आहेत. पंतप्रधान विश्वकर्मा योजना समाजातील विविध १८ व्यवसाय करणाऱ्या लोकांना त्यांचा पारंपरिक व्यवसाय करताना अर्थसाहाय्य व्हावे यासाठी राबविली जात आहे; परंतु टेलर आणि गवंडी लाभार्थ्यांना प्रशिक्षण काळात प्रतिदिन ५०० रुपयांचे विद्यावेतन, प्रमाणपत्र आणि साधने घेण्यासाठी १५ हजार



रुपयांचा लाभ देण्यास स्थगिती दिली आहे

पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्यासाठी, अर्जदारांना श्रमिक पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागतो. अर्जदारांच्या त्रिस्तरीय पडताळणीनंतर त्यांना योजनेचा लाभ दिला जातो. ग्रामीण आणि शहरी संस्थांसाठी पडताळणीसाठी स्वतंत्र यंत्रणा आहेत. ग्रामीण भागात पडताळणीची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडे आली आहे. त्यामुळे शहरी भागात प्रथम स्तरावरील पडताळणीकार्यकारी अधिकारी करतात.पीएम विश्वकर्मा योजना समाजातील पारंपरिक व्यवसाय करण्यासाठी सुरू केलेली आहे. या योजनेंतर्गत समाजातील सर्व जातींना प्रशिक्षणासह कर्ज कमी व्याजदरात उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### निवडीचे निकष काय?

अर्ज करणाऱ्या व्यक्तीकडे त्याचे जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ फक्त भारतीय नागरिकांनाच मिळणार आहे, अर्ज करणारी व्यक्ती एकतर कुशल कारागीर किंवा कारागीर असणे आवश्यक आहे.गवंडी कामे व टेलरची कामे करणारी व्यक्ती ही आधीच प्रशिक्षित असते. त्यामुळे या व्यक्तींना प्रशिक्षण देणे व साहित्य खरेदीसाठी लाभ देण्यास सध्या स्थगिती आहे.

# अंगणवाडी सेविकांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

## मानधन वाढ व शासकीय दर्जा देण्याची मागणी : अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर कडक बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

राज्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्प अंतर्गत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस मिळून दोन लाख महिला कर्मचारी काम करीत आहेत.मात्र या महिला कर्मचाऱ्यांना अतिशय तोकडे मानधन देण्यात येत असल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे.या




महिला कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी या मागणीसाठी अमरावती जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. अंगणवाडी सेविकांना २५ हजार रुपये महिना तर मदतनीस महिलेला १८ हजार रुपये मासिक मानधन देण्यात यावे याशिवाय या महिला कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी यावेळी आंदोलक महिलांनी केली.यावेळी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त जिल्हाधिकारी कार्यालयावर तैनात करण्यात आला होता


# आकर्षक डिझाइन, वॉटरप्रूफ पाकिटातून लाडक्या भाऊरायाला पाठवा आता राखी

## डाक विभागात मुबलक पाकिटे उपलब्ध : एक रुपये ८० पैशांचा जीएसटीचा भुर्दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

पुढील महिन्यात आलेला रक्षाबंधन सण साजरा करण्यासाठी तसेच बाहेरगावी राहत असलेल्या भावाला राखी पाठविण्यासाठी डाक विभागाने खास आकर्षक डिझाइनमध्ये व वॉटरप्रूफ असलेले पाकीट उपलब्ध केले आहेत. या पाकिटातून पोस्टाद्वारे पाठवल्या जाणाऱ्या राख्यांसाठी स्वतंत्र सेवा डाक विभागाकडून राबवली जात आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी सध्या एक हजार पाकिटे डाक कार्यालयाला उपलब्ध झाली आहेत.

रक्षाबंधनाचा सण पुढील महिन्यात असून, ज्या बहिणीला भावाकडे अथवा भावाला बहिणीकडे प्रत्यक्ष जाता येत नाही, त्यांच्यासाठी डाक विभागाने वॉटरप्रूफ व खास रक्षाबंधनाचे डिझाइन असलेले पाकीट तयार केले आहे. या पाकिटातून पाठवल्या



जाणाऱ्या राख्या या सुरक्षित व वेळेत पोहोचविण्याचे काम डाक विभाग करणार असून, यासाठी त्यांनी स्वतंत्र शॉर्टिंग, पॅकिंग व ते वेळेत पोहोचविण्यासाठी यंत्रणा ठेवली आहे.

**गतवर्षीप्रमाणे यंदाही यंदाही सुविधा**

रक्षाबंधन स्पेशल राखी कव्हर'ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या व रंगात आकर्षक राखी कव्हर हे गोंदिया जिल्ह्यातील डाक विभागांच्या कार्यालयांत उपलब्ध असणार आहे. पाकीट वॉटरप्रूफ असल्याने राखी खराब होण्याचा धोका यामुळे नसणार आहे.

**ऑडिटमध्ये त्रुटीमुळे पाकिटांवर जीएसटी लागणार**

रक्षाबंधनासाठी पोस्टात उपलब्ध असलेल्या पाकिटांची किंमत १० रुपये व त्यावर जीएसटी एक रुपये ८० पैसे आकारला जाऊन पाकीट १२ रुपयांना दिले जात आहे. त्यामुळे सण-संस्कृतीच्या योजना राबविताना जीएसटी कर आकारला जाऊ नये, अशी अपेक्षा बहिणी करीत आहेत. मात्र, डाक विभागाच्या ऑडिटमध्ये गतवर्षी हरकत आल्याने हे पाकीट जीएसटीसह विक्रीस उपलब्ध आहेत.

# 'गाड्या फोडायच्या तर पवार, ठाकरे, फडणवीसांच्या फोडा'; प्रकाश आंबेडकरांचं आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ परभणी**

चिल्लरांच्या गाड्या फोडण्यापेक्षा शरद पवार, उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस यांच्या गाड्या फोडा, असं आवाहन वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलंय.



दरम्यान, वंचित बहुजन आघाडीची आरक्षण बचाव यात्रा आज परभणीमध्ये दाखल झाली. यावेळी जाहीर सभेत बोलताना प्रकाश आंबेडकरांनी राज्यातील सध्याच्या परिस्थितीवर थेट भाष्य केलंय. प्रकाश आंबेडकर म्हणाले, राज्यात सध्या गाड्या फोडल्या जात आहेत. या गाड्या फोडणाऱ्यांना जरा आवर घाला, चिल्लर लोकांच्या गाड्या काय फोडता, तुम्हाला जर गाड्याच फोडायच्या असतील तर मी नावं सांगतो, त्यांच्या गाड्या फोडा. शरद पवार, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे यांच्या गाड्या फोडा म्हणजे हे लोकं पोपटासारखे बोलू लागतील की आम्ही कोणाच्या बाजूने आहोत, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत.